अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
✲ कॉन्ट्यूरा व्हिजन ✲ मोतिबिंदू ✲ काचबिंदू ✲ नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३१.१०.२०२५ | अंक नं. १७४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

राहण्याची सोय
मामाचा मळा
कृषी पर्यटन केंद्र
हुरडा पार्टी आपल्या सेवेत उपलब्ध..
✲पत्ता : नगर-सोलापूर रोड, रुईछत्तीसी, अ.नगर
Water Park
वॉटर पार्क
स्वीमिंग टँक, रेन डान्स, कोलंबस, ट्रॅक्टर राईडस्, ॲडव्हेंचर गेम व इतर बरेच काही...
फक्त 200/- / 100 /- रुपयांत
चुलीवरचे जेवण
मिकी माऊस
बुल राईड
निसर्गरम्य
हुरडा पार्टी बुकींग सुरु..
रेन डान्स
जंपिंग टेबल
मो : 98 90 77 25 20, 9730979700
नगर-सोलापूर रोड, नगरपासून १५ मिनिटांच्या अंतरावर, रुईछत्तीसी.

14 वा वर्धापनदिन
१ नोव्हेंबर
आपण दिलेल्या प्रेम..सहकार्य यावरच
आज आम्ही 14 वा वर्धापनदिन साजरा करीत आहोत.
पुरूषांचे परिपूर्ण वस्त्र दालन..
RC lifestyle
creating fashion statement...
FORMAL | CASUAL | PARTYWEAR | ETHNICWEAR | ACCESSORIES
2436, एम.जी.रोड, तेलीखुंट, अहमदनगर. फोन : ०२४१-२३५५०१८
Visit us at : www.rclifestyle.in

# पोलिस बंदोबस्तात मनपाकडून मोहीम; ४० पेक्षा जास्त अतिक्रमणांवर कारवाई

## अतिक्रमणे हटविल्याने कायनेटिक चौक परिसराने घेतला मोकळा श्वास







कायनेटिक चौक परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविताना महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक. (छाया - अमित मन्यार)

नगर - महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ३१ ऑक्टोबर रोजी सकाळपासून मोठ्या पोलिस बंदोबस्तात कायनेटिक चौक परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविली. या धडक मोहिमेत पक्की बांधकामे, पत्र्यांचे शेड, टपऱ्या अशी ४० पेक्षा जास्त अतिक्रमणे दुपारपर्यंत हटविल्याने या परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

कायनेटिक चौक परिसरात खाद्यपदार्थ, फळविक्रेत्यांच्या तसेच जे हॉटेल, दुकाने आहेत, त्यांच्या रस्त्यावर मांडलेल्या फलकांच्या अतिक्रमणांचा विळखा पडलेला होता. या अतिक्रमणांमुळे नगर शहराचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या आणि ३ महामार्ग एकत्र येणाऱ्या कायनेटिक चौक परिसरात दररोज सायंकाळी तर कधी दिवसाही वाहतूक कोंडी होत होती. या वाहतूक कोंडीने वाहन चालकांसह नागरिक हैराण झाले होते. वाहतूक कोंडीमुळे या परिसरात सातत्याने छोटे मोठे अपघातही होत होते.

विशेष करून दररोज सायंकाळच्या वेळी ही वाहतूक कोंडी ठरलेली आहे. त्यामुळे नगर शहरातून केडगावपर्यंत ३-४ किमीचे अंतर जाण्यासाठी अर्धा ते पाऊण तास लागत असे. या वाहतूक कोंडीत बऱ्याच वेळा रुग्णवाहिकाही अडकत. त्यामुळे रुग्णांना वेळेवर रुग्णालयात घेवून जाण्यासाठी रुग्णवाहिका चालकांना मोठी कसरत करावी लागत असे. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकून एखाद्या रुग्णाला वेळेवर उपचार न मिळाल्याने आपला जीव गमवावा लागण्याचीही शक्यताही निर्माण झालेली होती. महापालिका आणि महामार्ग प्रशासनाने या चौकात होणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई करून ती हटवावीत तसेच या कारवाईत सातत्य ठेवावे, अशी मागणी परिसरातील नागरिक करत होते.

या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजेपासून मोठ्या पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम सुरु केली. महापालिका उपायुक्त संतोष टेंगळे, अतिक्रमण विरोधी पथक प्रमुख अभियंता सुरेश इथापे, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख, अमोल कोतकर, रमेश कोतकर, प्रभाग अधिकारी एस.बी.तडवी यांच्यासह २० ते २५ कर्मचाऱ्यांचे पथकाने जेसीबी, क्रेन या सहाय्याने ही मोहीम राबविली.

अतिक्रमण हटाव मोहीमे- मुळे कायनेटिक चौक परिसराने मोकळा श्वास घेतला असला तरी पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी या मोहिमेत महापालिकेने सातत्य ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### जुगार, मटका अड्ड्यांसह हॉटेल, दुकानांसमोरील पक्क्या अतिक्रमणांवर कारवाई

या कारवाईत हॉटेल, दुकानाबाहेर सिमेंटचे केलेले पक्के अतिक्रमण, फुटपाथवर उभारलेले पत्र्यांचे शेड, टपऱ्या अशी ४० पेक्षा जास्त अतिक्रमणे सकाळी ९ ते दुपारी २ या कालावधीत हटविण्यात आली. विशेष म्हणजे ज्या टपऱ्या व पत्र्यांचे शेड काढण्यात आले. त्यात जुगार व मटक्याचे अड्डे असल्याचे कारवाई वेळी दिसून आले. त्यामुळे कायनेटिक चौकाला फक्त अतिक्रमणांनी नव्हे तर अवैध धंद्यांनी ही विळखा घातला होता, हे समोर आले. या कारवाईच्या वेळी अनेकांनी अतिक्रमण विरोधी पथकाशी हुज्जत घातली. मात्र पथकाने याला न जुमानता कारवाई सुरूच ठेवली. दुपारी ३ नंतर पुन्हा मोहीम सुरु करून उर्वरित अतिक्रमणे काढली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

पाहिजेत
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
कॅशियर
जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मोड कारागीर
जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
सराफी क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
बुधवार चालू

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
COURSE DETAILS
100% JOB ASSISTANCE
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING | ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
DiSHA® An ISO 9001:2015 Certified COMPUTER INSTITUTE
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमध्ये गॅस रिफीलिंग सेंटरवर पुरवठा विभागाचा छापा

नगर – घरगुती गॅस सिलेंडर मधून बेकायदेशीर पणे वाहनांमध्ये गॅस रिफीलिंग करणाऱ्या सेंटरवर पुरवठा विभागाने छापा टाकत ६४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ३० ऑक्टोबर रोजी दुपारी १ च्या सुमारास अमरधाम जवळील मोकळ्या जागेत असलेल्या पत्र्याच्या शेड मध्ये करण्यात आली. हे गॅस रिफीलिंग सेंटर चालविणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहर अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालयातील पुरवठा निरीक्षक तेजस बाबूलाल पाटील यांनी फिर्याद दिली आहे. अमरधाम जवळील मोकळ्या जागेत असलेल्या पत्र्याच्या शेड मध्ये गॅस रिफीलिंग सेंटर सुरु असून या ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडर मधून बेकायदेशीर पणे वाहनांमध्ये गॅस रिफीलिंग केले जात असल्याची माहिती पुरवठा विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुरवठा विभागाच्या पथकाने पोलिसांच्या समवेत जावून तेथे छापा टाकला.

या पथकाची चाहूल लागताच सेंटर चालक तेथून पसार झाला. या पथकाला त्या ठिकाणी भारत गॅस कंपनीचे सिलेंडर, वजन काटा, रिफिलिंग मशीन व एक रिक्षा असा मुद्देमाल आढळून आला पथकाने तो जप्त केला. या प्रकरणी अज्ञात सेंटर चालकावर बी.एन.एस. कलम २८७, २८८, १२५, ३ (५) सह जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेवगावातील हल्ल्याच्या निषेधार्थ वकिलांचा ३ नोव्हेंबरला ‘न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहण्याचा ठराव’

नगर – गेल्या काही दिवसामध्ये महाराष्ट्रातील अनेक भागात वकीलांवरती विविध हल्ले झालेले आहेत. एवढेच नव्हेतर काही वकीलांना आपल्या जीवास मुकावे लागले आहे. याबाबतीत अनेक बार असोसिएशनकडून निषेधाचे ठराव प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे वकीलांच्या संरक्षणासाठी कायद्याचा मसुदा तयार करुन सदरहू मसुदा आपल्याकडे आपल्या सूचनांसाठी पाठविण्यात आलेला होता. महाराष्ट्रातील अनेक बार असोसिएशनने या मसुद्यामध्ये महत्वपूर्ण सूचना आणि सुधारणा सुचविल्या होत्या. त्याचा विचार करुन वकील संरक्षण कायद्याचा कच्चा मसुदा ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला होता. या प्रश्नावर वारंवार सार्वजनिक कार्यक्रमामध्ये बार कौन्सिलमार्फत आवाज उठविण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न विचारार्थ आहे, असे अनेक सार्वजनिक कार्यक्रमात सांगितले होते.

अहिल्यानगरमधील शेवगाव तालुक्यातील वकीलावर त्यांनी उलट तपासणीमध्ये विचारलेल्या प्रश्नावर चिडून जावून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाने आपल्या सर्वसाधारण सभेमध्ये २९ ऑक्टोबर रोजी हल्ल्याचा तीव्र निषेध करुन ठराव पारित केला आहे. त्याचप्रमाणे वकील वर्गाचे आत्मसन्मानासाठी, सुरक्षेसाठी आणि बार असोसिएशनच्या स्वातंत्र्यासाठी ३ नोव्हेंबर रोजीचे न्यायालयीन कामकाजापासून एक दिवसासाठी अलिप्त राहून निषेध व्यक्त करण्याचा ठराव पारित केला आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व सभासदांना ॲडव्होकेट प्रोटेक्शन बिलाच्या मागणीसाठी ३ नोव्हेंबर रोजी न्यायालयाच्या कामकाजापासून अलिप्त राहून तसेच विविध प्रकारच्या अन्य माध्यमातून या विषयाकडे लोकांचे लक्ष वेधावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भामध्ये पास झालेल्या ठरावाची प्रत मुख्य न्यायाधिश आणि प्रधान जिल्हा न्यायाधिश यांना देखील देण्यात येणार आहे. तसेच आपआपल्या स्थानिक पातळीवरती प्रेस नोट काढणे, तसेच अन्य प्रकारे शांततामय आंदोलन करावे जेणेकरुन या मागणीकडे संबंधितांचे लक्ष वेधले जाईल. स्थानिक वर्तमान पत्रामध्ये आलेले लेख / बातमी बार कौन्सिलकडे पाठवावे.

वकील वर्गाच्या आत्मसन्मासाठी, सुरक्षेसाठी व स्वातंत्र्यासाठी सगळ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा अध्यक्ष ॲड. अमोल एस. सावंत, उपाध्यक्ष अहमदखान पठाण, ॲड. पी. देशमुख, ॲड. मोतीसिंग जी. मोहता, ॲड. वसंत डी. साळुंके, ॲड. अण्णाराव नी. पाटील, ॲड. जयंत डी. जायभावे, ॲड. अनिल एम. गोवरदिपे, ॲड. विठ्ठल बी. कोंडे देशमुख, ॲड. संग्राम डी. देसाई, ॲड. पारिजात एम. पांडे, ॲड. गजानन बी. चव्हाण, ॲड. मिलिंद एस. थोबडे, ॲड. अविनाश ने. भिडे, ॲड. वसंतराव इ. भोसले, ॲड. सुभाष ने. घाटगे, ॲड. आशिफ कुरेशी, ॲड. अविनाश बी. अव्हाड, ॲड. मिलिंद एस. पाटील, ॲड. हर्षद व्ही. निंबाळकर, ॲड. सतिष ए. देशमुख, ॲड. सुदिप आर. पासबोला, ॲड. विवेकानंद घाटगे, ॲड. डॉ. उदय वारुंजीकर, ॲड. राजेंद्र बी. उमाप यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

# वकीलांवरील हल्ल्याच्या भाजप आघाडीतर्फे निषेध

नगर – शेवगाव येथील न्यायालय आवारात मंगळवारी दुपारी ॲड. रविंद्र प्रकाश सकट यांच्यावरती विरोधी पक्षकाराने भ्याड हल्ला केला. या हल्ल्याच्या निषेधार्थ भाजप वकील आघाडीतर्फे आघाडीचे अध्यक्ष ॲड. चंदन बारटक्के यांच्या अध्यक्षतेखाली निषेध सभा होऊन वकील आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करुन तीव्र निषेध नोंदविला.

यावेळी निषेध सभेसाठी ॲड. संदीप काळे, ॲड. सौरभ राऊत, ॲड. विनय महाजन, ॲड. संतोष भोसे, ॲड. कैलास कोतकर, ॲड. व्यंकटेश शिरसूल, ॲड. निखिल मुसळे, ॲड. योगेश मांडोत, ॲड. निखिल सुपेकर, ॲड. सचिन घावटे, ॲड. हरिकुमार कल्याणी, ॲड. देवेंद्र बंब, ॲड. रुपेश भांबरे, ॲड. आशिष पोटे, ॲड. रवि लगड, ॲड. गणेश शर्मा, ॲड. किरण वनारसे, ॲड. वर्धमान भंडारी, ॲड. अविनाश साखला आदी उपस्थित होते.

# वकीलांवर हल्ला प्रकरणी बार असोसिएशनतर्फे निषेध

नगर – शेवगाव येथील न्यायालयातील वकील रविंद्र सकट यांच्यावर विरोधी पक्षकाराकडून हल्ला झाला. त्याचा निषेध करण्यासाठी अहमदनगर बार असोसिएशनने ॲड. रफीक बेग यांचे अध्यक्षतेखाली तातडीने सभा घेऊन त्यात हल्लेखोराचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला.



वकीलांवर हल्ला प्रकरणी बार असोसिएशनतर्फे निषेध सभा घेण्यात आली.

यावेळी अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, विशेष सरकारी वकील सुरेश लगड, कृष्णा झावरे, लक्ष्मण कचरे, युवराज पाटील, रामेश्वर कराळे, गौरव दांगट, राजेंद्र शेलोत, संजय सुंबे, प्रभाकर शहाणे, सनी वाघमारे, सौरभ राऊत, अमित गाडेकर, अभिजीत देशमुख, अमोल अकोलकर, सुधीर भागवत, आनंद सुर्यवंशी, आयात बेग, सागर गायकवाड, तुषार कोतकर, बाबाजी सांगळे, संदीप खांदे, अजय गर्जे, सचिन मेहत्रे आदी वकील बंधू उपस्थित होते.

यावेळी राजेश कातोरे यांनी सांगितले की, शेवगाव येथील सकट वकीलांवर झालेला हल्ला निंदनीय आहे. वकीलांवर होणाऱ्या वकील संरक्षण कायदा त्वरीत मंजूर करावा. या हल्लयातील आरोपीवर कडक कारवाई करावी व वकील संरक्षण कायदा मंजूर करावा असे निवेदन कलेक्टर यांना द्यावे, अशी मागणी ॲड. वैभव आघाव, ॲड. सुरेश लगड, रफीक बेग यांनी केली.

तसेच ३ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात वकील संरक्षण कायदा मंजूर करावा यासाठी प्रयत्न प्रत्येक वकील संघाने तसा ठराव पारित करण्याचे ठरले, अशी माहिती ॲड. वैभव आघाव यांनी दिली.

## योगेश जगताप यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भुतकरवाडी येथील रहिवासी योगेश बाळासाहेब जगताप (वय ३५) यांचे ३१ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, चुलते, चुलती असा परिवार आहे. गणेश जगताप यांचे ते बंधू होत.

## निरज सोन्ने यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सोनेवाडी (ता.भुम, जि.उस्मानाबाद) येथील रहिवासी निरज महारुद्र सोन्ने (वय ३१) यांचे ३० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मुळगावी सोनेवाडी (उस्मानाबाद) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## चंद्रकांत चेतवानी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गुलमोहोर रोड येथील रहिवासी चंद्रकांत नथुमल चेतवानी (वय ६०) यांचे ३० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, भावजय, २ मुले, सुन असा परिवार आहे.

## शरद वाघघुमरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – स्वातंत्र्य सैनिक कॉलनी भिंगार येथील रहिवासी शरद भास्कर वाघघुमरे (वय ५४) यांचे ३० ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, १ भाऊ, भावजय, १ मुलगी असा परिवार आहे.

## कुसूमबाई गायकवाड यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील कुसूमबाई देवराव गायकवाड (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात सात मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



श्रीरामपूर बागायतदार सोसायटीचे माजी चेअरमन स्व.देवराव फकिरबा गायकवाड यांच्या त्या पत्नी तर शेतकरी सतीश गिरमे, सुधीर बोरावके, दत्तात्रय शिरसाठ पा., धनंजय बधे, गौतम टिळेकर, सागर घोडेकर यांच्या सासुबाई, निलेश सुभाष बोरावके व प्रतिक सुधीर बोरावके यांच्या आजी होत.

# शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मनपा आयुक्तांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन

### तत्काळ कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा रिपब्लिकन सेनेचा इशारा

नगर – अहिल्यानगर शहरातील नागरिकांवर मोकाट कुत्र्यांचा हैदोस सुरू झाला आहे. शहरातील विविध भागांमध्ये रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी फिरणे अवघड झाले असून लहान मुले, महिला आणि वयोवृद्ध नागरिक दररोज भयभीत जीवन जगत आहेत. या वाढत्या त्रासाकडे मनपा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने व साईराम सोसायटी च्या वतीने मनपा आयुक्तांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष बाळू वाघमारे, संजय ताकवले, विजयराव वडागळे, सनी माघाडे, आसिर सय्यद, ज्ञानेश्वर बिमन, श्रीपाद वाघमारे, दिनेश शिंदे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. आंदोलनाच्या दरम्यान घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रीयतेचा निषेध नोंदवला.



अहिल्यानगर शहरातील नागरिकांवर मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने व साईराम सोसायटीच्या वतीने मनपा आयुक्तांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट प्रचंड प्रमाणात वाढला आहे. या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, अनेक अपघातसदृश घटना घडत आहेत. विशेषतः नगर–कल्याण रोडवरील साईराम सोसायटी परिसरात मोकाट कुत्र्यांचा त्रास अत्यंत तीव्र असून, या परिसरातील रहिवासी दररोज भीतीच्या छायेत जीवन जगत आहेत.

मागील काही महिन्यांत साईराम सोसायटी परिसरात दोन बालकांना आणि दोन वयोवृद्धांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला होता. त्यांना गंभीर दुखापत झाल्याने नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला होता. कालच पुन्हा एका सात ते आठ वर्षांच्या मुलावर मोकाट कुत्र्यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच फेब्रुवारी महिन्यातही याच मागणीचे निवेदन मनपा प्रशासनाला देण्यात आले होते. मात्र गेल्या सात ते आठ महिन्यांत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. मनपा प्रशासनाने तातडीने कुत्रे पकडणाऱ्या ठेकेदारांना आदेश देऊन मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम सुरू करावी. अन्यथा रिपब्लिकन सेना तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला

दरम्यान, नागरिकांच्या सुरक्षिततेशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे मनपा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. शहरातील वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या संख्येमुळे अनेक भागात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, प्रशासनाने यावर तातडीने ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# २ ट्रक सफरचंदाची परस्पर विल्हेवाट लावत १९ लाख रुपयांची फसवणूक

### नगरमधील व्यापाऱ्याची फिर्याद, कामगारासह ५ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगरमधील फळ व्यापाऱ्याने हिमाचल प्रदेश मधून मागावलेल्या ८ ट्रक सफरचंदापैकी २ ट्रक सफरचंदाची परस्पर विल्हेवाट लावून व्यापाऱ्याची १९ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी व्यापाऱ्याकडे काम करणारा कामगार, ट्रक चालक, मालक अशा ५ जणांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संतोष प्रभू ढवळे (वय ४६, रा. माळीवाडा, अ.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा फळांचा ठोक व्यापार असून त्यांचे शेंडी (ता.नगर) येथे गोडावून आहे. ते नेहमी हिमाचल प्रदेश येथील एका कंपनीकडून सफरचंद मागवतात.त्यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये हिमाचल प्रदेश येथून ८ ट्रक सफरचंद मागवले होते. त्यासाठी त्यांच्या कडे काम करणारा मोईन शेख मुन्शी बागवान (रा.बुलढाणा) याला हिमाचल प्रदेश येथे पाठविले होते.

२८ ऑगस्ट रोजी या सफरचंदाचा व्यवहार पूर्ण होवून ८ ट्रक कंपनीतून नगरकडे येण्यास निघाले. त्यातील ६ ट्रक निर्धारित वेळेत नगरमध्ये फिर्यादी ढवळे यांच्या गोडावूनला पोहचले, मात्र २ ट्रक तसेच त्यांचा कामगार मोईन शेख हा नगरमध्ये आला नाही. त्याच्याशी संपर्क करूनही तो न झाल्याने फिर्यादी यांनी अधिक चौकशी केली असता मोईन शेख याने त्याचा भाऊ मोहसीन शेख मुन्सी बागवान(रा.बुलढाणा), ट्रक मालक व चालक सत्यनारायण पांडे (रा.भोपाळ, मध्यप्रदेश), शफी बागवान (रा.बुलढाणा), देवेंद्र पंडित (रा.किसनगढ, राजस्थान) यांच्याशी संगनमत करून एका ट्रक मधील (क्र. आर.जे.१४ जी.आर.६३३४) सफरचंदाच्या ५०५ फुल पेट्या व ७२ हाफ पेट्या, तर दुसऱ्या ट्रक मधील (क्र. डी.डी.०१ आर ९९४२) सफरचंदाच्या ७०३ फुल पेट्या अशा एकूण १८ लाख ९९ हजार ९३२ रुपये किंमतीचे सफरचंद यांची परस्पर विक्री करून विल्हेवाट लावली असल्याचे त्यांना समजले.

या ५ जणांनी संगनमताने आपली आर्थिक फसवणूक केली असल्याचे ढवळे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी ५ जणांच्या विरुद्ध बीएनएसकलम ३१८ (४), ३ (५), ३५२, ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मनोज मोंढे हे करत आहेत.

# किराणा दुकान आणि हॉटेलमध्ये गुटखा, सुगंधी तंबाखूचा साठा पोलिसांनी पकडला

### एमआयडीसी परिसरात २ ठिकाणी कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – एमआयडीसी परिसरात किराणा दुकान, हॉटेल मध्ये गुटखा, पान मसाला, सुगंधी तंबाखूचा केलेला साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला आहे. दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत दोघांना ताब्यात घेत त्यांच्या कडून ४ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि.किरणकुमार कबाडी यांना गोपनीय माहिती मिळाली की, बापु कोतकर (रा. निंबळक) हा त्याचे निंबळक उड्डाणपुलाजवळील रेणुका किरणा स्टोअर्स मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला जवळ बाळगुन त्याची विक्री करत आहे. ही माहिती मिळाल्यावर त्यांनी उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार विष्णु भागवत, अतुल लोटके, राहुल द्वारके, भिमराज खर्से, भगवान थोरात, अर्जुन बडे यांच्या पथकाला कारवाई साठी पाठविले.

या पथकाने बापु मच्छिंद्र कोतकर (वय ४०, रा.गजानन कॉलनी, नवनागापुर) याच्या निंबळक उड्डाणपुलाजवळील रेणुका किरणा स्टोअर्स येथे छापा टाकून १ लाख ९३ हजार ५८५ रुपये किमतीचा राजश्री पान मसाला, व्ही १ तंबाखु, विमल पान मसाला, जी १ जर्दा नावाची तंबाखु, गोवा पान मसाला जप्त केला. त्यानंतर पथकास मिळालेल्या माहितीनुसार माऊली उर्फ ज्ञानेश्वर रमेश गायकवाड (वय ३६, रा. नगर मनमाड रोड, विळद घाट) याच्या हॉटेल हर्षदा येथे शेडवर छापा टाकला असता सदर शेडमध्ये २ लाख १२ हजार रुपये किमतीचा गोवा पानमसाला, विमल पान मसाला, जी १ नावाची तंबाखु, व्ही १ नावाची तंबाखु मिळुन आली आहे. या दोघांच्या विरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात पो. हे.कॉ.विष्णु भागवत यांच्या फिर्यादी वरून भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर हे पडेल महागात

बऱ्याचदा आपण कामात व्यस्त असल्याने लघवी करणे पुढे ढकलतो. तुम्हाला वाटेल की एक-दोनदा लघवी रोखून ठेवणे ही मोठी गोष्ट नाही, परंतु प्रत्यक्षात या छोट्या सवयी तुमच्या शरीराला गंभीर नुकसान करू शकतात. होय, लघवी रोखून ठेवल्याने अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. लघवी जास्त वेळ रोखून ठेवल्याने लघवी उलट होते, ज्यामुळे मूत्राशयात जळजळ आणि संसर्ग होण्याचा धोका वाढतो. मूत्राशयाचा संसर्ग गंभीर असू शकतो, तो प्रजनन क्षमता कमकुवत करू शकतो. कधीकधी येथील स्नायू देखील कमकुवत होतात इतरही अनेक समस्या उद्भवू शकतात. यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी एकदा लघवी करा. जर तुम्ही अशा ठिकाणी जात असाल जिथे तुम्हाला शौचालय शोधणे कठीण जाऊ शकते, तर घराबाहेर पडण्यापूर्वी एकदा लघवी करायला विसरू नका. योग्य प्रमाणात पाणी प्या, जेणेकरून हायड्रेशन टिकून राहील पण लघवी वारंवार ओव्हरफ्लो होणार नाही.

## पाककला

### फ्रुट कस्टर्ड

**साहित्य :** १ लिटर दूध, १ वाटी हिरवी द्राक्ष, १ वाटी काळी द्राक्ष, १ सफरचंद, २ केळ, १ वाटी डाळिंबाचे दाणे, २ ते तीन टेबलस्पून कस्टर्ड पावडर, १ वाटी साखर, वेलची पूड,

**कृती :** सर्वप्रथम दूध गरम करावे आणि त्यामध्येच साखर टाकून साखर विरघळून घ्यावी दूध गरम झाल्यानंतर एका वाटीमध्ये वेगळे दूध काढून त्यात कस्टर्ड पावडर घालून ती विरघळवून घ्यावी. विरघळलेली कस्टर्ड पावडर गरम दुधात ओतून ते दूध हलवत राहावे म्हणजे त्याला एक घट्टपणा येतो तसेच त्यात वेलची पूड घालून घ्यावी घट्टपणा यायला लागल्यानंतर दूध बंद करावे. आता फ्रुट सॅलड मध्ये घालणारे फ्रुट्स जे उपलब्ध आहेत ते घ्यावेत त्याचे काप करून घ्यावेत आणि दूध थंड झाल्यानंतर त्यामध्ये ते सगळे फ्रुट्स घालून घ्यावेत यात तुम्ही ड्रायफ्रुट्स ही घालू शकता त्यानंतर हे सर्व मिश्रण फ्रीजमध्ये थंड होण्यासाठी ठेवावे फ्रुट सॅलड हे फ्रुट कस्टर्ड किंवा फ्रुट सॅलड हे थंडच खाण्यास छान लागते.

## वास्तू

❊ घरामध्ये जाळे कधीही होऊन देऊ नका, अन्यथा जाळे नशीबावर लागतात आणि कामात अडथळे येतात.

❊ मंदिरात धूप, अगरबत्ती आणि हवन कुंड दक्षिण दिशेला आग्नेय कोपऱ्यात ठेवावी.

❊ नेहमी गाईसाठी पहिली चपाती भाकरी काढा. यामुळे देव-देवता प्रसन्न तर होतातच त्याच सोबत पितरांनाही शांती मिळते.

❊ दुर्वा दररोज गणपतीला अर्पण करा याने सुखसमृद्धी येईल. त्याचप्रमाणे दुर्वांचे झाड घरात लावल्याने संततीची प्राप्ती होते.

## सल्ला

काचेच्या वस्तूंचा पिवळटपणा घालविण्यासाठी एका भांड्यात कोमट पाणी घ्या त्यामध्ये १ चमचा कोलगेटची पेस्ट टाकून मिक्स करा स्पंजच्या मदतीने हे काचेचे भांडे घासून घ्या. भांडी चकाचक दिसतील.

## सौंदर्य

नेहमी कोरडे केस ठेवल्याने केसांच्या मुळांपर्यंत पोषण पोहोचत नाही त्यामुळे आठवड्यातून एकदा केसांना खोबरेल तेल लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०२५

**प्रबोधिनी (स्मार्त) एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, शततारा १८।२१, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** तुम्ही तुमच्या पालकांना धार्मिक स्थळी घेऊन जाऊ शकता ज्यामुळे त्यांना आनंद होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित राहणार आहे.

**वृषभ :** कौटुंबिक सदस्यांना मदत कराल. जोडीदाराकडून खूप पाठिंबा मिळेल. इतरांच्या कामामध्ये दखल देणे समस्या निर्माण करू शकते.

**मिथुन :** पैशांच्या व्यवहारात काळजी घ्या. आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी ठरणार आहे. प्रलंबित असेल तर ते पूर्ण होऊ शकते.

**कर्क :** जर तुमचे कोणतेही काम बराच काळ प्रलंबित असेल तर आज तुम्हाला त्याकडे लक्ष द्यावे लागेल. भविष्यातील काही योजनांमध्ये पैसे गुंतवू शकता.

**सिंह :** जर तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आज तुमची इच्छा पूर्ण होईल.

**कन्या :** आज तुम्हाला तुमच्या खाण्यापिण्याकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आरोग्य बिघडू शकते.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. तुम्ही सामाजिक कार्यातही पूर्ण रस दाखवाल.

**वृश्चिक :** मालमत्ता खरेदी करताना समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला नवीन काम सुरू करण्याची संधी मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी खर्चिक राहणार आहे.

**धनु :** तरुणांना त्यांचे करिअर सुधारण्याची संधी मिळेल. भविष्यासाठी गुंतवणूक कराल. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल राहणार आहे.

**मकर :** तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून खूप पाठिंबा आणि सहवास मिळत असल्याचे दिसून येते. जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.


**कुंभ :** महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात थोडा वेळ घालवाल. नोकरीच्या माध्यमातून फिरायला जाण्याची संधी मिळेल.

**मीन :** कामाच्या ठिकाणी तुमचे काही विरोधक तुमच्यावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतील जे तुम्हाला टाळावे लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२९३

सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७२९२ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भारतीय जनता पक्षाच्या एक नेत्या तथा माजी केंद्रीय मंत्री ५) एक विषम संख्या ७) अखंड; न तुटता ८) एक शास्त्र; केमिस्ट्री १०) सरळ; प्रामाणिक; नीतिमान ११) गोळा करणारा; जमविणारा १२) एक दक्षिण भारतीय खाद्यपदार्थ १३) वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज १५) मैदा; सोजी १६) वस्तू; डाग; पर्वत १८) कोणत्या प्रकारचा २०) रक्त; रुधिर (ग्रामीण भाषेत) २२) मंगल नसलेले २४) विष्णुपत्नी; लक्ष्मी २५) दार; दरवाजा; द्वार २६) अस्वस्थता; तडफड

**उभे शब्द :-** १) परत देण्याच्या कराराने मागून आणणे (वस्तू, पैसे वगैरे) २) स्वामी; पती; यजमान; नवरा ३) वाटा; हिस्सा ४) धनुष्यबाण ५) एक दुचाकी वाहन ६) शरीर; देह; काया ९) वर्ष; सन; झाडाची त्वचा; शक ११) कामबंद आंदोलन; हरताळ १२) दक्षिण भारतातील एक थंड हवेचे एक ठिकाण १४) जिल्ह्याचे ठिकाण असलेले विदर्भातील एक शहर १७) फळातील रसाळ भाग; मगज १९) एक मौल्यवान लाकूड व त्याचे झाड २१) तापलेले; उष्ण २२) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी २३) वाईट सवय; खोड

# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपल्या डोळ्यांना जे चुकीचे करताना दिसतंय ते बरोबर करण्याचा नेहमी प्रयत्न करावा भले ते कर्म असो वा कार्य.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मानवी शरीरातील अवयवांची काय किंमत आहे?

हृदयाबद्दल काय बोलावं मंडळी? जोवर हृदयाचे ठोके चालू, तोवर जीवनाचे चक्र चालू! एकदा का हे ठोके बंद पडले म्हणजे संपलं सगळं. मग अशा या हृदयाची किंमत किती महाग असेल याचा विचारच करायला नको. तर हृदयाची काळ्याबाजारात किंमत आहे सुमारे ८० लाख रुपये. आजकाल टक्कल ठेवायची फॅशन असली तरी केसांचं महत्त्व काही कमी नाही. ज्यांना केस नाहीत त्यांच्याइतकं केसांचं महत्त्व दुसऱ्या कुणाला कळणार नाही. अशा या केसांची किंमत असते १० इंचाला साडेचार हजार रुपये.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान हे आपण नेहमीच वाचतो. आणि ते खरंच आहे मित्रांनो. आजच्या धावपळीच्या जगात अपघातांचं प्रमाण वाढलंय आणि त्यामुळं रक्ताची गरजसुद्धा. रक्ताची एक पिशवी काळ्याबाजारात १७०० ते २२,००० रुपयांना मिळते. रक्तगट जेवढा दुर्मिळ, तेवढी तुमच्या रक्ताची किंमत जास्त!! म्हणून रक्तदान करताना नेहमी अधिकृत ठिकाणी करा आणि आवर्जून रक्तदान करा.

बोनमॅरो हा शरीरातला महत्वाचा भाग आहे. हाडांच्या पोकळीत असलेल्या उती म्हणजे टिश्यूजना आपण बोनमॅरो म्हणतो. मांसाहारी लोक नळी फोडून आतलं जे खातात ते हेच! नवीन रक्तपेशी बनवणं, नवीन हाड, चरबी आणि कूर्चा म्हणजेच कार्टिलेज बनवण्यासाठी बोनमॅरो शरीरात असणं आवश्यक असतं. एक ग्रॅम बोनमॅरोची बाजारात किंमत आहे तब्बल १६ लाख रुपये.

कुणी गरीबीला कंटाळून किडनी विकायला निघाले, पेंडिक्स सांगून किडनीच काढली अशा घटना आपण नेहमी वाचतो. त्याचं एक कारण असं आहे की शरीरात दोन किडन्या असतात आणि एकीवर आपलं काम चालू शकतं, आणि दुसरं म्हणजे किडनीला बाजारात मिळत असलेला भाव!! जिवंत माणसाच्या एका किडनीला सव्वा ते दीड कोटीचा भाव मिळतो, तर मेलेल्या माणसाच्या किडनीला जवळपास दहा लाख ते दीड कोटी असा भाव मिळतो. पुन्हा एकदा रक्तगट, त्यामुळं किडनी जुळणं वगैरे भानगडी असतात. जेवढं दुर्मिळ तेवढं महाग हे सूत्र आहेच.

लिव्हर म्हणजेच यकृत शरीरातली सर्वात मोठी ग्रंथी आहे. यकृत पित्ताची निर्मिती करतं. लिव्हर खराब झाल्यास बेवडे मरतात हे तर आपल्याला माहित आहेच. तर लिव्हरची किंमत असते साधारण १ कोटी रुपये. बुब्बुळ डोळ्यातला महत्वाचा भाग असतो आणि म्हणून खूप महागसुद्धा आहे. बुब्बुळांची एक जोडी जवळपास एक लाखात विकली जाते. पांच इंद्रियांमधील एक म्हणजे त्वचा! या १ इंच त्वचेची किंमत आहे, १५ ते २० हजार रुपये. प्लास्टिक सर्जरी वगैरेंसारख्या गोष्टीत ती लागतेच. स्काल्प म्हणजे आपली टाळू विकली जाते साधारण ५० हजार रुपयांना. कवटी पण विकली जाते? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. हो, कवटी विकली जाते साधारण ८५ हजार रुपयांना.

किती महाग अवयव आपल्याला फुकटात मिळाले आहेत! आपल्याला याचं महत्व कळायला पाहीजे. जर एकेक अवयव इतके महाग आहेत, तर पुर्ण आयुष्य किती अनमोल असेल याचा विचार करा. जीवन अमूल्य आहे आणि म्हणूनच जीवनावर प्रेम करा.

## नंदीकेश्वर

राजा जनमेजयाने वैशंपायन ऋषींना विचारले, नंदी या साधारण पशूच्या अंगी एवढी विलक्षण शक्ती कोठून आली? तसेच शंकराचे ते वाहन कसे झाले? यावर वैशंपायन ऋषी म्हणाले, शिरवी नावाचा एक महान तपस्वी ऋषी होता. तो एके दिवशी इंद्राला भेटायला गेला असता त्याचा अपमान झाला. इंद्राला शासन करेल असा पुत्र आपल्याला लाभावा या हेतूने त्याने घोर तप केले. ब्रह्मदेव प्रसन्न झाले व त्यांनी तुला इंद्र, विष्णू व महादेव यांच्यापेक्षाही पराक्रमी पुत्र मिळेल असा वर दिला. त्याप्रमाणे शिरवी ऋषींच्या शेंडीतून अत्यंत तेजस्वी असा चतुष्पाद पशू पडला. ब्रह्मदेवांनी त्याचे नाव नंदिकेश्वर ठवले. तो वरुण, अग्नी व वायू यांचे प्रतीक असल्याचे सांगितले. भूक लागली म्हणून पित्याच्या सांगण्यावरुन नंदी क्षीरसागरातील दूध पिऊ लागला.

विष्णूचे दूत तसेच स्वतः विष्णू यांनाही तो आवरेना. साठ दिवस युद्ध झाल्यावरही तो हरेना म्हणून विष्णूच त्याच्यावर प्रसन्न होऊन द्वापरयुगात मी तुझे पालन करीन, असे त्यांनी आश्वासन दिले. पुढे पुन्हा भूक लागल्यावर पित्याच्या सांगण्यावरून नंदी इंद्राच्या नंदनवनातील तृण खाऊ लागला. तेव्हा इंद्राशी त्याचे युद्ध झाले. त्याच्या शेपटीच्या झटक्याने इंद्र कैलासावर शंकरांच्या पुढ्यात पडला. नंदीने इंद्राच्या सिंहासनाचा चक्काचूर केला. इंद्राच्या विनंतीनुसार शंकराचे सैन्य नंदीवर चालून गेले. पण नंदीपुढे सैन्यच काय, खुद्द शंकरही हताश झाले. त्याची अचाट शक्ती पाहून त्यांनी त्याच्यावर कृपा केली.

तेव्हा नंदी शंकरांना म्हणाला, आज तुझ्यासारखा याचक भेटला याचा मला आनंद होतो. तू माझ्याकडे काहीतरी माग. यावर शंकराने त्याला आपले वाहन हो, असे मागणे मागितले. मोठ्या संतोषाने नंदीने ते मान्य केले. शंकरांनी त्याचा स्वीकार करून त्याला सतत आपल्याजवळ ठेवण्याचे तसेच आपल्या अगोदर तुझे दर्शन घेतले जाईल असे सांगितले. तू आपल्या उदरात क्षीरसागरातील दूध, नंदनवनातील गवत व सर्व शस्त्रे साठवलीस म्हणून तुझ्या शेणाचे भस्म मी सर्वांगाला लावत जाईन, असेही शंकर म्हणाले. याप्रमाणे शंकर व नंदी यांचा सहवास घडून आला. सर्व देवांनी शंकराचे नाव पशुपती असे ठेवले. हे कळल्यावर शिरवी ऋषीलाही आनंद झाला.

## जीवन का अमृत (भाग १)



आंतरिक ज्योति के साथ भी यही बात लागू होती है, ऐसी ज्योति जो के साम्राज्य से आती है। यह एक प्राकृतिक विज्ञान है और इसे इंसान ने नहीं बनाया। इसे सिद्ध किया जा सकता है। यह भावनाओं या तर्क-वितर्क का रास्ता नहीं है। यह देखने और सुनने का मजमून है १ जिनकी आँखें हैं, वे देखें और जिनके कान हैं, वे सुनें ।

अंतर में आत्म-अनुभव से आप पाएँगे कि आप खुद चट्टान जैसे मजबूत हो जाते हैं, जिसे औरों के शब्दों की मूसलाधार बारिश भी नहीं हिला सकती । भावनाएँ, तर्क-वितर्क या इंद्री ज्ञान त्रुटिपूर्ण हो सकता है, पर आत्म-अनुभव सर्वोपरि है ।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

आत्म-अनुभव से आप प्रकृति के इस विज्ञान को पूरी तरह समझ जाओगे और तब आप दूसरों को भी प्रेमपूर्वक समझा सकते हैं कि सच क्या है ।

मैंने आपकी आर्थिक व्यवस्था के बारे में पढ़ा, जो कि सतगुरु की अपार दया से ठीक हो गई है। सतगुरु अपने शिष्यों की हर प्रकार से, जिंदगी के हर क्षेत्र में संभाल करता है। पर जुआ खेलना एक महापाप है और आध्यात्मिक जिज्ञासुओं को खबरदार किया जाता है कि अपने आध्यात्मिक विकास के बड़े हित को ध्यान में रखते हुए वे जुआ न खेलें ।

७३. मैं आपके दिलों में प्रेम के बीज बोना चाहूँगा, ताकि प्रेम की भावना सब तक पहुँचे, संसार के सभी देशों, जाति, रंग और वर्ग में। सभी संतों ने यही उपदेश दिया - प्रेम करना सीखो, आपको सब बरकतें मिलेंगी।

यदि हम प्रभु को सच्चे हृदय से और व्यावहारिक तौर से प्रेम करना चाहते हैं, तो हमें अपने साथियों से प्रेम करना चाहिए। जितना प्रेम हम अपने दोस्तों, रिश्तेदारों से करते हैं, उतना ही हम, और लोगों से भी करें। हम दूसरों की खुशी में खुश हों और दूसरों के दुःख में दुःखी हों। जो कुछ भी हमारे साथ घटता है, उसे हम खुशी-खुशी निभाए और सहन करें तथा प्रभु के किसी भी जीव को नुकसान न पहुँचाएँ। आपको पता होना चाहिए कि प्रभु से प्रेम करने के लिए हमें प्रभु के लिए जीना होगा और प्रभु के लिए मरना होगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

संकल्प होता है। संकल्प दिखता नहीं परंतु बहुत शक्तिशाली है। हमारे दिमाग में ऐसी सूक्ष्म मशीनरी है जो किसी भी जीव व पदार्थ को देखते ही उसे अणु में बदल देता है। मान लो हम मेज को देखते हैं तो देखते ही मन उसे छोटा से छोटा बनाना शुरू कर देता है। उसका एक ग्राम बना देता है। फिर उस ग्राम के एक लाख टुकडे कर देता है। इस लाखवें टुकड़े को अणु कहते है । हमारा मन इस अणु को फिर एक करोड़ हिस्सों में बांट देता है। यह जो करोड़वा अंश प्रकृति का सबसे छोटा रुप है। इसे कवनटम कहते हैं। यही संकल्प का सूक्ष्म रुप है। हमारे अन्दर जो भी अच्छे बुरे संकल्प चल रहे हैं। वह सब इतने सूक्ष्म हैं। कवंटम लेवल पर संकल्प में जो विद्युत बल है, जो चुम्बकीय शक्ति है,

### आज्ञा चक्र

जो प्रकाश है उन सब का भी इतना सूक्ष्मतम रुप है। यहीं पर आत्मा, परमात्मा और प्रकृति का मिलन स्थान है। यहीं पर तीनों एक दूसरे को प्रभावित करते हैं। यहीं पर तीनों का एक दुसरे पर असर होता । इस कवनटम लेवल पर जा कर हम पहचानते हैं कि यह मेज है। यह फलाना व्यक्ति है, घर है, गाड़ी है, स्कूटर है, रिक्शा है, फलाना बच्चा है, फलानी पुस्तक है, फलाना शब्द है और वहीं से मन रिवर्स चलता है और उन देखी गई चीजो को बड़ा बनाता जाता है और हम उसे मेज या अन्य कोई भी वस्तु व व्यक्ति कह कर पुकारते हैं। यह सारी प्रक्रिया पल भर में ही पूरी हो जाती है। यह कार्य दिमाग के विभिन्न भाग करते हैं। हम हर विचार इस लेवल पर करते हैं। अर्थात हम जो कुछ देखते हैं, करते हैं, सोचते हैं, बोलते हैं चाहे अच्छा चाहे बुरा, इतना गहराई पर जा कर सोचते हैं। किसी चीज को उठाना हो तो इस कवनटम लेवल पर मन प्रकृति की किसी चीज को उठाने का आदेश देता है तब हम वह वस्तु उठाते हैं। यही परमात्मा की फ्रीकवेन्सी है। यहीं पर हर विचार ईथर तत्व में प्रवेश करता है तथा सारे ब्रह्मांड में फैल जाता है। संसार में जितने भी अच्छे वा बुरे काम हो रहे हैं वह सब इस कवनटम लेवल से हो रहे हैं। संस्कार में जो चीजे हैं वह इतनी गहराई पर पड़ी हुई हैं। यहीं पर रोग पनपते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**चिंटू :** तुझ्याकडे माझा मोबाईल नंबर आहे ना? मग पत्र का पाठवलेस?

**पिंटू :** आधी फोनच केला होता पण एक बाई सारखी सांगत होती, 'प्लीज ट्राय लेटर'!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ कोणत्या देशाने कच्चे तेल, पेट्रोलवरील विंडफॉल कर रद्द केलाय?

– भारत

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

संस्कार हे आजी-आजोबांकडूनच मिळू शकतात. सहसा नातवंडांचे आई-वडील घरात उपस्थित असतील, तर त्या वेळी नातवंडांच्या बाबतीतील निर्णय आई-वडिलांना घेऊ द्यावेत. ज्या वेळी नातवंडांचे आई-वडील घरात उपस्थित नसतील, तर अशा वेळी आपण आजी-आजोबा म्हणून निर्णय घ्यावेत.

३. नातवंडांना घडविताना, शिस्त लावताना जर त्याचे आई-वडील त्याला समजावून सांगत असतील, तर त्यांच्यामध्ये आजी-आजोबांनी न पडलेलेच बरे! कारण भविष्यात मुलाच्या चांगल्या किंवा वाईट वागणुकीला आई-वडिलांनाच तोंड द्यावे लागते.

### आजी-आजोबांची साथ

याकरिता शिस्त लावण्याचे काम हे आई-वडिलांनीच करावे व त्याला आजी-आजोबा म्हणून तुम्ही मदत करावी. अनेक वेळा नातवंडांच्या बाबतीत निर्णय घेताना आजी-आजोबा विरुद्ध आई-बाबा असे चित्र अनेक घरांत बघायला मिळते व त्यामध्ये नुकसान नातवंडाचे होते. बालसंगोपन करताना अनेक वेळा सास-सून यांच्यामध्ये वाद होताना दिसतात. सहसा एकमेकींनी मुलांसमोर एकमेकींविषयी वाईट बोलू नये. त्याचे दुष्परिणाम मुलांवर दिसून येतात. दोघींनी एकमेकींचा आदर ठेवावा व एकमेकींमधल्या चांगल्या गोष्टींची जाणीव ठेवावी. तुमच्या बोलण्यामध्ये सभ्यता, नम्रता व आदर असेल, तरच तुमच्यासमोर घडणारे मूलही भविष्यात तुमच्याशी आदरयुक्त बोलेल.

५. आजी-आजोबांकडून नकळत नातवंडांचे लाड जास्त होतात. या लाडांवर वेळीच आवर घालावा.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# संजय गांधी निराधार पेन्शन जमा होण्यास तांत्रिक अडचणी

## संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या वतीने तहसीलदार संजय शिंदे व प्रांत सुधीर पाटील यांना निवेदन

नगर – डिसेंबर २०२४ पासून संजय गांधी निराधार अनुदान योजना लाभार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीमार्फत थेट जमा होऊ लागल्याने हा उपक्रम सर्वसामान्यांसाठी दिलासा देणारा ठरला आहे. मात्र, काही दिव्यांग आणि जेष्ठ नागरिकांचे आधार अपडेट न झाल्याने जानेवारी २०२५ पासून बरेच लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे या लाभार्थ्यांपुढे उपासमारीची वेळ आली असून शासन स्तरावर तातडीने पत्रव्यवहार करून उपाय योजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.


संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या वतीने तहसीलदार संजय शिंदे व प्रांत सुधीर पाटील यांना पेन्शनसंदर्भातील अडचणींबाबत निवेदन देण्यात आले.

संजय गांधी निराधार अनुदान जमा होण्यास तांत्रिक अडचणी झाल्याने अनेकांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने संजय गांधी निराधार अनुदान समितीच्या वतीने तहसीलदार संजय शिंदे यांनी निवेदन देण्यात आले. यावेळी समिती प्रांत सुधीर पाटील, समिती अध्यक्ष राजू दारकुंडे, समिती सदस्य वसंत शिंदे, समिती सदस्य बाबासाहेब धीवर, विजयाताई बडे आणि गीते पाटील उपस्थित होते.

शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेचा उद्देश गरजू आणि निराधार व्यक्तींना आर्थिक मदत देणे हा आहे; मात्र तांत्रिक कारणांमुळे खरोखर पात्र असलेले लाभार्थी आजही वंचित राहत आहेत. अनेकांनी आधार अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न केले, परंतु तांत्रिक कारणामुळे प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. परिणामी जानेवारी २०२५ नंतर एकही हप्ता त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही.

या वेळी बोलताना भाजपा दिव्यांग जिह्वाध्यक्ष वसंत शिंदे म्हणाले, संजय गांधी निराधार योजना म्हणजे आयुष्याचा आधार आहे. शासनाने केलेली डीबीटी प्रणाली चांगली आहे, परंतु काही लाभार्थ्यांना माहितीअभावी आणि तांत्रिक त्रुटीमुळे न्याय मिळत नाही.बऱ्याच दिव्यांगना मागील महिन्यात २५०० रु. ऐवजी १५०० रु.जमा झाले, याबाबत तहसील प्रशासनाने गावागावात शिबिरे घेऊन अशा लाभार्थ्यांचे प्रश्न तातडीने सोडवावेत, हीच आमची मागणी आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या योजनेतील लाभार्थ्यांची आर्थिक अवस्था अत्यंत हलाखीची आहे. काही जणांना महिन्यांपासून औषधे व अन्न घेणेही परवडत नाही. प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर अनेकांचे जीवन धोक्यात येईल.

संजय गांधी शाखेचे नायब तहसीलदार श्री.भानवसे यांच्याकडे निवडणूक शाखेचे कामकाज असल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. वारंवार त्यांना इलेक्शन कामकाजा करिता बोलावले जाते यांचा परिणाम संजय गांधी शाखेच्या कामकाजवर पडत आहे. याबाबद लवकरच समितीचे सर्व सदस्य जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांनाही निवेदन देणार आहोत असे समिती अध्यक्ष राजू दारकुंडे यांनी यावेळी सांगितले, कारण मंजूर प्रकरणांची खाते पुस्तका वेळेत न मिळाल्याने लाभार्थ्यांना आर्थिक फटका बसला आहे. विशेष म्हणजे, ऑगस्ट २०२५ नंतर या योजनेची बैठकच झालेली नाही, त्यामुळे अनेक प्रकरणे तहसील कार्यालयात अडकून आहेत. पुढील आठवड्यात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता लक्षात घेता, बैठक घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

तहसीलदारांनी उपस्थितांना आश्वासन दिले की, आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच या प्रकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात येईल. सर्व प्रलंबित प्रकरणांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाईल.

तहसीलदारांनी पुढे सांगितले, संजय गांधी निराधार योजना ही शासनाची जनहिताची योजना आहे. लाभार्थी एकही वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील.


वधू वर मेळाव्यात आ. विठ्ठलराव लंघे पाटील, अशोक कुटे, गणेश लंघे, कारभारी गरड, डॉ.करणसिंह घुले व इतर.

# 'मराठा सोयरीक संस्थेचे' अशोक कुटे यांचे ५००० पेक्षा जास्त लग्न जमवण्याचे पवित्र कार्य

### आमदार विठ्ठलराव लंघे यांचे प्रतिपादन

नगर – वैवाहिक जीवन जगत असताना पती–पत्नी मध्ये वितुष्ठ आल्यास मध्यस्थांना नाहक कटकटी व मनस्ताप करत सामोरे जावे लागत असल्याने मध्यस्थ आता लग्न जमवण्यासाठी धजावत नाहीत. अशा परिस्थितीत मराठा सोयरीक संस्थेमार्फत अशोक कुटे यांनी ५००० पेक्षा जास्त लग्न जमवून खूप मोठे पवित्र कार्य केले आहे, असे उद्गार आमदार विठ्ठलराव लंघे यांनी नेवासा फाटा येथील मोफत वधू वर परिचय मेळावा प्रसंगी काढले.

जगदंब फाउंडेशन च्या वतीने मराठा सोयरीक संस्थेने नेवासाफाटा येथील जी.के मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या मोफत वधू–वर मेळाव्यात आ. लंघे बोलत होते. ते म्हणाले मराठा सोयरीक संस्थेचा पहिला मेळावा याच ठिकाणी नेवासा येथूनच सुरु झाला व येथेच १०१ वा मेळावा होत असून राज्यात विविध ठिकाणी १०० मेळावे पार पडले आहेत. मेळाव्यास जगदंब फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश लंघे, मराठा सोयरीक संस्थेचे अशोक कुटे, डॉ. करणसिंह घुले, कारभारी गरड, गोरक्षनाथ पटारे, अंकुश काळे, नानासाहेब दानवे, गोरक्षनाथ कोतकर, अनिता कोतकर, मोहन हेलकुटे, मा. प्राचार्य पंडितराव खाटीक, भैय्यासाहेब कोठुळे, रावसाहेब घुमरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी पालकांनी जास्त अपेक्षा न बाळगता आपल्या मुला मुलींच्या विवाहाची तडजोड करून लग्न जमवावे, असे मत अशोक कुटे यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, राहुरी, संभाजीनगर, श्रीरामपूर, गंगापूर आदी ठिकाणाहून पालक व अपेक्षित वधू वर आले होते.

पुढील मेळावा नाशिक रोड येथे ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्या व इतर मेळाव्यासाठी ८८४७७२४६८० यावर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

# 'डॉ. झाकीर हुसेन आधुनिकीकरण योजनें'तर्गत मदरशांनी १४ नोव्हेंबरपर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज सादर करा

नगर – सन २०२५–२६ या वर्षासाठी मदरशांना पायाभूत सुविधा आणि शिक्षक मानधन देण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत इच्छुक मदरशांनी १४ नोव्हेंबर पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा योजनेचे सदस्य सचिव दीपक दातीर यांनी केले आहे.

योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त किंवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरशांना दिला जाणार आहे. ज्या मदरशांना स्कीम फॉर प्रोव्हायडींग क्वालिटी एज्युकेशन इन मदरसा या केंद्र पुरस्कृत योजनेचा लाभ मिळालेला आहे, त्या मदरशांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी आणि इंग्रजी या विषयांचा अभ्यासक्रम राज्य शासनाच्या इतर शाळां–प्रमाणेच राहील. मदरशांतील शिक्षकांचे प्रतिदिन पाच तासांचे काम निश्चित करण्यात येईल.

या योजनेंतर्गत मदरशांच्या इमारतींचे नूतनीकरण व डागडुजी, पेयजलाची व्यवस्था, प्रसाधनगृह उभारणी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर, मदरशांच्या निवासी इमारतींमध्ये इन्व्हर्टरची सुविधा, संगणक, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, प्रिंटर, प्रयोगशाळा साहित्य, सायन्स किट, मॅथेमॅटिक्स किट आणि इतर आवश्यक साहित्यासाठी अनुदान देण्यात येईल.

शासन निर्णय ११ ऑक्टोबर २०१३ नुसार नमूद केलेल्या विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज सादर करावेत. शासन निर्णय व अर्जाचा नमुना http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, असेही कळविण्यात आले आहे.

# परिवर्तन प्रतिष्ठान आयोजित चला दुकानदार होऊया उपक्रमाच्या माध्यमातून पूरग्रस्तांना मदत

नगर – परिवर्तन प्रतिष्ठान या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी दीपावलीच्या निमित्ताने चला दुकानदार होऊया हा उपक्रम दरवर्षी घेतला जातो. या उपक्रमामध्ये नगर शहरातील विविध शाळांमधील ई. ५ वी ते ९ वीचे विद्यार्थी सहभागी होतात. यावर्षी १९ ऑक्टोबर रोजी हा उपक्रम घेतला गेला, यामध्ये १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.


परिवर्तन प्रतिष्ठान आयोजित चला दुकानदार होऊया उपक्रमाच्या माध्यमातून पूरग्रस्तांना मदत करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे शालेय वयामध्येच व्यवहार ज्ञान पक्के व्हावे, वस्तू विक्री कौशल्य, संवाद कौशल्य आत्मसात व्हावे असा या उपक्रमामागचा उद्देश असल्याचे संस्थेचे सचिव वैद्य अनिकेत घोटणकर यांनी सांगितले.

यावर्षीच्या चला दुकानदार होऊया चे वैशिष्ट्य म्हणजे उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने स्वकमाईतून पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या स्वकमाईतून रु. २१, ००० रक्कम जमा झाली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वकमाईचा आनंद मिळतोच परंतु त्याचबरोबर कुणासाठी काही देण्याचाही आनंद मिळावा, तसेच त्यातून त्यांची समाजासाठी काही करण्याची वृत्ती निर्माण व्हावी असा आमचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे संस्थेच्या खजिनदार सौ. मुग्धा घोटणकर यांनी सांगितले.

उपक्रमाला ज्ञानेश शिंदे, उद्योजक अशोक थत्ते, गिरीश मुळे, व्यावसायिक लक्ष्मीकांत चिकटे, विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी ई. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या उपक्रमात उत्तम संवाद कौशल्य, उत्तम सादरीकरण, स्वतः बनवलेल्या वस्तू विक्री तसेच दातृत्वाबद्दल विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र करंदीकर उपस्थित होते.

जमा झालेला मदत निधी जनता सहकारी बँकेच्या नगर शाखेच्या सहाय्यक शाखा अधिकारी रुपाली गांगुर्डे, प्रियांका कदम तसेच इतर सहकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. हा मदत निधी मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये जमा झाला असून त्यामार्फत पूरग्रस्तांपर्यंत पोहोचणार आहे. बाल दुकानदारांनी केलेल्या या छोट्याश्या मदतीचे कौतुक होते आहे.

सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी परिवर्तन प्रतिष्ठानच्या सौ. प्रज्ञा असनिकर, सौ. अश्विनी भालेराव, संस्थेच्या व्यवस्थापिका सौ. मानसी देशपांडे तसेच पालवी शिशुविहार शाळेच्या सर्व शिक्षिकांनी प्रयत्न केले.

बालक मंदिर महिला मंडळ शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ व सहकारी शिक्षिका यांचे सहकार्य लाभले.

# भावी पिढी थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी विवाहपूर्व तपासणी आवश्यक

## डॉ. विलास मढीकर यांचे प्रतिपादन; जनकल्याण रक्तकेंद्रात थॅलेसेमिया बालक–पालक स्नेहमेळावा व दीपावली फराळ

नगर – थॅलेसेमिया हा एक अनुवंशिक आजार असून तो आई–वडिलांकडून मुलांमध्ये जातो. जर दोघेही थॅलेसेमिया कॅरियर असतील, तर होणाऱ्या मूलाला थॅलेसेमिया होण्याची शक्यता २५ टक्के असते. त्यामुळे भावी पिढी थॅलेसेमिया मुक्त करण्यासाठी विवाहपूर्व तपासणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर यांनी केले आहे.


जनकल्याण रक्तकेंद्र आयोजित थॅलेसेमिया बालक–पालक स्नेहमेळावा व दीपावली फराळ उत्साहात पार पडला.

थॅलेसेमिया मुक्त भारत घडविण्याच्या उद्देशाने नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात थॅलेसेमिया बालक–पालक स्नेहमेळावा व दीपावली फराळ उत्साहात पार पडला. या मेळाव्यामध्ये थॅलेसेमिया पालकांनी येणाऱ्या अनेक अडचणी सांगितल्या. आपलं दुःख कोणीतरी समजून घेत आहे. याचा आनंद थॅलेसेमिया पालक आणि बालकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. याप्रसंगी जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, संचालक रुपेश भंडारी, डॉ.वसंत झेंडे, प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, सहा. प्र.अधिकारी स्मिता बडवे, जनसंपर्क अधिकारी सोनाली खांडरे, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, सोनाली खांडरे, करण भोसले, गौरव पठाडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सागर उंडे म्हणाले, रा.स्व.संघाच्या जनकल्याण समिती, महाराष्ट्र प्रांत या संस्थेतर्फे प्रारंभ करण्यात आलेले थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र हे अभियान सुरू करून नुकतेच सहा महिने होऊन गेले. जनकल्याण रक्तपेढी परिवाराने थॅलेसेमिया जनजागृतीसाठी जिल्हावार समन्वयकांच्या नियुक्त्या केल्या. महाराष्ट्रभर व्यापक थॅलेसेमिया जनजागृती सुरू झाली. जनकल्याण रक्तपेढी परिवार थॅलेसेमियाग्रस्तांना गेली ४२ वर्षे सातत्याने विनामूल्य रक्तसेवा पुरवत आहे. गेल्या आर्थिक वर्षात एकूण २१४३ थॅलेसेमियाग्रस्तांना रू.४,२५,३३,५३४ (रूपये चार कोटी, पंचवीस लाख, तेहतीस हजार, पाचशे चोतीस) इतक्या किमतीची रक्त पिशव्या देण्यात आल्या.

गौरव पठाडे म्हणाले की, जनकल्याण रक्तकेंद्रात थॅलेसेमिया बालकांची आपुलकीने विचारपूस केली जाते. तसेच सध्या १५० थॅलेसेमिया बालकांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. थॅलेसेमिया रुग्ण पालकांमध्ये परस्पर संवाद व विचारांचे आदानप्रदान व्हावे, तसेच समाजात या आजाराविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, संचालक रुपेश भंडारी, डॉ.वसंत झेंडे आदींनी मार्गदर्शन केले.

या स्नेहमेळावाप्रसंगी एकूण ८० थॅलेसेमिया बालकांना कार्यक्रमासाठी संपर्क केला. त्यातील बऱ्याच जणांची उपस्थिती कार्यक्रमास होती. सुत्रसंचलन स्मिता बडवे यांनी केले. सोनाली खांडरे यांनी आभार मानले.

# अनवरअली सय्यद यांनी राष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकून वाढवला जिल्हा पोलीस दलाचा गौरव

## डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन, स्नेहबंध सोशल फाउंडेशनतर्फे सत्कार

नगर – जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद यांनी ५५ व्या वर्षी क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून पोलीस दलाचा गौरव वाढवला. स्पर्धांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांची शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती सुधारते, त्यांच्यातील नेतृत्वगुण आणि सांघिक भावनेला प्रोत्साहन मिळते आणि त्यांना तणावमुक्त राहण्यास मदत होते. सय्यद यांनी राष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकून जिल्हा पोलीस दलाचा गौरव वाढवला आहे. त्यांचे हे यश तसेच इतर पोलिसांसाठी प्रेरणादायी, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.


'स्नेहबंध' तर्फे अनवरअली सय्यद यांचा सत्कार करताना अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे.

सूरत येथील वीर नर्मदा युनिव्हर्सिटीत झालेल्या नॅशनल वेटरनस मास्टर गेम्स स्पर्धेत अनवरअली सय्यद यांनी धावण्याच्या प्रकारात यांनी गट ५५ वयोगटात सुवर्ण पदक पटकावले. याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे उपस्थित होते.

सय्यद यांनी ४४ हजार १०० मीटर रिले धावण्याच्या प्रकारात उत्कष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्ण पदक मिळवले.

पोलीस उपअधीक्षक (गृह) जगदीश भांबळ, पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, राखीव पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.


गोवा वास्को येथील श्री महालक्ष्मी उत्सवानिमीत्त दीपावली पाडव्याच्या दिवशी स्वरौत्सव या कार्यक्रमात सौ. वर्षा पंडित यांनी गायलेल्या मराठी भक्तीगीत व भावगीतांची बहारदार मैफल गोव्यातील रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळाली.

# सौ. वर्षा पंडित यांच्या गायनाने गोव्यात संगीत रसिक मंत्रमुग्ध

नगर – हिंदु समाज श्रीमहालक्ष्मी पूजनोत्सव समिती, मुरगांव, गोवा वास्को येथील श्री महालक्ष्मी उत्सवानिमीत्त दीपावली पाडव्याच्या दिवशी स्वरौत्सव या कार्यक्रमात सौ. वर्षा पंडित यांनी गायलेल्या मराठी भक्तीगीत व भावगीतांची बहारदार मैफल गोव्यातील रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळाली.


गायिका सौ. वर्षा चंद्रकांत पंडित यांच्या समवेत गोव्यातील अशोक मांद्रेकर, राज्ञी नितिन फळदेसाई व सिया उपाडेंकार, तनिष्का सातार्डेकार यांनी सह गायन केले. गाण्याच्या साथीसाठी सार्थ गोवेकर (तबला), विघ्नेश सावंत (हार्मोनियम), सुरेश घाडी (सिंथेसायझर), महादेव गावडे (ऑक्टोपॅड), तेजस तोरसकर (पखवाज), प्रदीप नाईक (तालवाद्य) यांची उत्तम साथ संगत लाभली.

या कार्यक्रमाचे पुरस्कर्ते माजी मंत्री मिलिंद सगुण नाईक यांच्या पुढाकारातून शैलेश गोवेकर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीमहालक्ष्मी उत्सव समितीचे सल्लागार उमेश साळगांवकार, समिती अध्यक्ष मनेष आरोलकार, शैलेंद्र गोवेकार, वासुदेव साळगांवकार, प्रशांत लोटलीकार, भरत कोलगांवकार, वामन चोडणकार इत्यादींच्या हस्ते दीप प्रज्वलन व देवी पूजन झाले. त्यानंतर गाण्यांचा कार्यक्रम सुरू झाला. त्यात मराठी भावगीत भक्तिगीतानी हा सुंदर कार्यक्रम श्री महालक्ष्मी मंदिर मुरगांव खारीवाडा वास्को गोवा येथे चंद्रकांत पंडित, पद्माकर वांजळे इत्यादी रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत झाला.

# विखे पाटील फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे 'अविष्कार' संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक यश

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित विभागीय स्पर्धेत सहा विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरीय अविष्कार–२०२५ फेरीसाठी निवड

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी कॉलेज, अहिल्यानगर येथील ६ विद्यार्थ्यांनी औषधनिर्माणशास्त्र शाखेतील सर्वात महत्त्वपूर्ण मानली जाणारी 'अविष्कार' संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित विभागीय अविष्कार संशोधन स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात भर घातली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.प्रताप पवार यांनी ही माहिती दिली.


डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी कॉलेज, अहिल्यानगर येथील ६ विद्यार्थ्यांनी औषधनिर्माणशास्त्र शाखेतील सर्वात महत्त्वपूर्ण मानली जाणारी 'अविष्कार' संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना मिळावी या उद्देशाने गेल्या १७ वर्षांपासून 'अविष्कार' स्पर्धेचे आयोजन केले जाते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित विभागीय स्पर्धेमधून विद्यापीठ स्तरीय अविष्कार–२०२५ स्पर्धेसाठी महाविद्यालयातील अर्पिता ढेकळे, निखिल शेंडोळे, सूरज काळे, रोहन कुमकर, ओंकार गाडे आणि सुमित देवकर या सहा विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

प्राचार्य प्रा. डॉ. पी.वाय. पवार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी बोलताना या विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. मानवी जीवनातील बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणारे आजार व त्यावर परिणामकारक औषधनिर्मितीसाठी औषधनिर्माण क्षेत्रात नवसंशोधन होणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

संशोधन समन्वयक डॉ. आर.एल. सावंत म्हणाले, औषधनिर्माण क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. या स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे आहे. मानवी शरीरात निर्माण होणारे विविध आजार, विशेषतः दुर्धर आजारांवर परिणामकारक औषधनिर्मिती हे एक आव्हान आहे. या स्पर्धेत यश मिळवणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते आणि आपल्या विद्यार्थ्यांनी ते पूर्ण केले.

यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे शैक्षणिक व संशोधन समन्वयक प्रा. डॉ. रमेश सावंत, प्रा. डॉ. गणेश गोडगे, डॉ. गणेश बरकडे, प्रा. मनीष रासकर आणि डॉ. स्मिता मिरेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, तसेच विश्वस्त व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, संचालक (तंत्र.) प्रा. सुनील कल्हापूरे, संचालक (मेडिकल) डॉ. अभिजीत दिवटे, प्राचार्य डॉ. प्रताप पवार यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रीय एकता दिन

## राष्ट्रनिर्मितीचा समाजशास्त्रीय पाया

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भारतभर 'राष्ट्रीय एकता दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून भारताच्या एकात्मतेच्या, अखंडतेच्या आणि राष्ट्रीय भावनेच्या मूळ तत्त्वांचा उत्सव आहे. या दिनाचे औचित्य स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात दृढ इच्छाशक्तीच्या, दूरदर्शी आणि संघटनशक्तीचे प्रतीक असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीशी संबंधित आहे. 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जाणारे पटेल यांनी विविध संस्थानांचे विलीनीकरण करून अखंड भारताचा पाया रचला. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिन हा केवळ एका नेत्याच्या स्मृतीचा नव्हे, तर भारतीय समाजाच्या एकात्मतेच्या तत्त्वांचा प्रतीकात्मक दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हा दिवस समाजाच्या ऐक्याची, सामूहिक ओळखीची आणि सामाजिक एकात्मतेची पुन्हा आठवण करून देतो.

भारतीय समाजाची रचना विविधतेने नटलेली आहे. धर्म, जात, भाषा, प्रांतिकता, संस्कृती, वंश या सर्व स्तरांवर असंख्य भेद आहेत. या विविधतेतून एक सशक्त राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही मोठे आव्हान होते. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांच्या मते, समाजाचे अस्तित्व 'सामाजिक एकात्मते'वर (Social Solidarity) अवलंबून असते. ही एकता दोन प्रकारची असते, यांत्रिक आणि सजीव एकता होय. भारतासारख्या विविधतेने भरलेल्या देशात सजीव एकात्मता आवश्यक आहे, जी विविध गटांच्या परस्परावलंबित्वातून आणि सहकार्याच्या भावनेतून निर्माण होते. राष्ट्रीय एकता दिन हे या सजीव एकात्मतेच्या तत्त्वाचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे विविध प्रांत, भाषा आणि संस्कृती यांना एकत्र आणून 'राष्ट्र' म्हणून एक नवीन सामाजिक ओळख निर्माण करणे. सरदार पटेल यांनी राजकीय पातळीवर ज्या 'संघटन'ची चळवळ चालवली, ती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'सामाजिक एकत्रीकरणा'चे (Social Integration) उत्तम उदाहरण आहे. त्यांनी ५६० हून अधिक संस्थानांचे भारतात विलिनीकरण केले, परंतु ही प्रक्रिया केवळ राजकीय नव्हती. ती मानसिक, सांस्कृतिक आणि सामाजिक पातळीवरही लोकांना एका धाग्यात बांधणारी होती.

आजच्या काळात, राष्ट्रीय एकतेची संकल्पना केवळ भौगोलिक अखंडतेपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती सामाजिक न्याय, समता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि संविधाननिष्ठेच्या मुल्यांवर आधारलेली आहे. भारतीय संविधानाने 'एकता आणि अखंडता' हा राष्ट्राचा मूलभूत उद्देश ठरवला आहे. समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांच्या मते, राष्ट्र हे केवळ राजकीय घटक नसून, सामायिक सांस्कृतिक स्मृती, परंपरा आणि मूल्यांनी बांधलेली सामाजिक रचना असते. म्हणूनच राष्ट्रीय एकता ही सामाजिक संबंधांच्या, सामायिक भावनांच्या आणि सामूहिक स्मृतींच्या जाळ्यावर आधारलेली असते. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक एकात्मतेस नव्या स्वरूपाची आव्हाने आहेत. डिजिटल माध्यमांद्वारे माहितीचा प्रसार जरी वेगाने होत असला तरी त्यातून मतभेद, असहिष्णुता, ध्रुवीकरण आणि विभाजनाच्या प्रवृत्ती वाढत आहेत. अशा वेळी राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य आपल्याला समाजातील तुटकेपणा ओळखून पुन्हा बांधणी करण्याची जबाबदारी स्मरवते. एकतेचा अर्थ सर्वांच्या मतांचे एकसंधीकरण नव्हे, तर विविधतेतून सामंजस्य साधणे हा आहे.

भारतीय समाजशास्त्रात एकतेची संकल्पना 'विविधतेत एकता' (Unity in Diversity) म्हणून विश्लेषित केली गेली आहे. ही संकल्पना केवळ घोषवाक्य नसून भारतीय सामाजिक जीवनाचा आत्मा आहे. समाजशास्त्रज्ञ जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि आंद्रे बेटे यांनी भारतीय समाजातील परस्परसंवाद आणि परस्परावलंबित्वावर भर देऊन एकतेचा समाजशास्त्रीय पाया स्पष्ट केला आहे. उदा. घुर्ये यांच्या मते भारतीय समाजात जातिभेद असला तरी परस्परपूरकतेचा एक धागा कायम राहिला आहे, ज्यामुळे समाजाचे विघटन झाले नाही. आजही राष्ट्रीय एकतेचा पाया या परस्परपूरक सामाजिक संबंधांमध्ये आहे. राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला हे लक्षात घ्यावे लागते की, राष्ट्र हे केवळ भौगोलिक मर्यादांमधील जनसमूह नव्हे, तर एकत्रित सामूहिक चेतना आहे. समाजशास्त्रज्ञ अँथनी स्मिथ यांनी Ethno-symbolism या संकल्पनेत राष्ट्रनिर्मितीत सांस्कृतिक प्रतीकांचे आणि ऐतिहासिक स्मृतींचे महत्त्व स्पष्ट केले आहे. सरदार पटेल यांचे कार्य हे अशाच प्रतीकात्मक राष्ट्रनिर्मितीचे उदाहरण आहे. त्यांनी भारतातील विविध जात, धर्म, भाषिक आणि प्रांतिक समुदायांना एकत्र आणण्यासाठी सांस्कृतिक प्रतीकांचा वापर केला, जसे की अखंड भारताची कल्पना, भारतीय ध्वज, संविधान, आणि सामूहिक राष्ट्रीय ओळख. परंतु आजच्या काळात या एकतेसाठी नव्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. प्रादेशिक अस्मिता, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, सामाजिक विषमता आणि आर्थिक असमानता यांमुळे राष्ट्रीय ऐक्याचे सूत्र ढवळून निघत आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'सांस्कृतिक विसंवाद' (Cultural Dissonance) म्हणून समजले जाते. या विसंवादावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समानतेची, सहिष्णुतेची आणि बंधुत्वाची भावना आत्मसात करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता ही केवळ राज्यकर्त्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे.

राष्ट्रीय एकता ही आर्थिक, राजकीय आणि सामाजिक स्तरावरही प्रतिबिंबित होते. आर्थिक विषमता वाढल्यास सामाजिक एकात्मता ढासळते, कारण समाजशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या मते, वर्गसंघर्ष हा समाजाच्या तुटकतेचा मूळ घटक आहे. म्हणून राष्ट्रीय एकतेसाठी सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता हे अपरिहार्य घटक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'राजकीय लोकशाही'सोबत 'सामाजिक लोकशाही'चे महत्त्व अधोरेखित केले आहे. ते म्हणतात, राजकीय समता टिकवण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समता आवश्यक आहे. हीच समता राष्ट्रीय एकतेचा आधार आहे. आजच्या तरुण पिढीसमोर जागतिक पातळीवर स्पर्धा, सांस्कृतिक मिश्रण आणि विचारसरणींचे विविध प्रवाह उभे आहेत. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीतील 'विविधतेत एकता' हा मूलमंत्र त्यांना सामाजिक संतुलन राखण्याची प्रेरणा देतो. शिक्षण प्रणाली, माध्यमे, सामाजिक चळवळी आणि नागरिक समाज या सर्व घटकांची भूमिका राष्ट्रीय एकतेला दृढ करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. समाजशास्त्रज्ञ पियरे बुरदिऊ यांच्या 'सांस्कृतिक भांडवल' (Cultural Capital) संकल्पनेनुसार, शिक्षण आणि संस्कृती या सामाजिक एकात्मतेचे महत्त्वाचे साधन आहेत. त्यामुळे शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी एकतेची आणि संवेदनशील नागरिकत्वाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजेत. राष्ट्रीय एकता दिन हा केवळ भूतकाळातील योगदानाची आठवण नाही, तर भविष्यातील जबाबदारीची जाणीव आहे. आज सामाजिक माध्यमांवरील ध्रुवीकरण, धार्मिक तणाव आणि ओळखींच्या राजकारणामुळे राष्ट्रीय भावना कमजोर होत आहे. या पार्श्वभूमीवर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून राष्ट्रीय एकतेचा पुनर्विचार आवश्यक आहे. सामाजिक संस्थांचे पुनर्बांधणीकरण, समावेशक धोरणे आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे हे यासाठी आवश्यक आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हे केवळ स्मारक नसून भारताच्या अखंडतेचे प्रतीक आहे. ते आपल्याला आठवण करून देते की राष्ट्राची शक्ती भौगोलिक विस्तारात नाही, तर नागरिकांच्या अंतःकरणात आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या ही एकता सामूहिक भावना, सहजीवन आणि परस्पर आदरावर आधारलेली आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन आपल्याला भेदभावाच्या भिंती पाडून सहकार्याचे पूल बांधण्याची प्रेरणा देतो.


शेवटी, राष्ट्रीय एकता म्हणजे विचार, संस्कृती आणि मूल्यांचा संगम आहे. ती कोणत्याही एका वर्चस्वावर नव्हे, तर सर्वांच्या सहभागावर आधारित आहे. समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेंसर यांच्या मते, समाज एक जीवंत शरीर आहे, त्यातील प्रत्येक घटकाने आपले कार्य समन्वयाने पार पाडले, तरच ते शरीर निरोगी राहते. भारताचे हे सामाजिक शरीर तेव्हाच सशक्त राहील, जेव्हा आपण धर्म, जात, भाषा, प्रांत यापलीकडे जाऊन एक भारतीय म्हणून विचार करू. राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने आपल्याला केवळ सरदार पटेलांच्या कार्याचे स्मरण करायचे नाही, तर त्यांच्या एकात्मतेच्या विचारांचा वारसा कृतीत उतरवायचा आहे. आज भारताला गरज आहे ती केवळ विकासाची नव्हे, तर मूल्याधारित एकतेची. समाजातील



प्रत्येक घटकाचा सन्मान राखत, असमानता दूर करत आणि संविधानातील मूल्यांचे पालन करत आपण खऱ्या अर्थाने एकात्म राष्ट्र घडवू शकतो. कारण राष्ट्रनिर्मिती हा एक दिवसाचा उत्सव नसून सातत्याने चालणारी सामाजिक प्रक्रिया आहे आणि त्याचे केंद्रबिंदू आहे राष्ट्रीय एकता.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल



आज ३१ ऑक्टोबर, भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज १५० वी जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले.

१९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला.

या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली.

बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीरच्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना जातीदिनी विनम्र अभिवादन!

# 'कृषी उत्पन्न बाजार समितीचा' कारभार अक्षय कर्डिलेंच्याच नेतृत्वाखाली चालणार

### माजी सभापती भानुदास कोतकर, बाजार समितीत स्व.आ. कर्डिले यांना श्रद्धांजली

नगर – भाजप नेते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या आकस्मात निधनाने सर्वांवर दुखांचा डोंगर कोसळला आहे. नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचा कारभार हा स्व. कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली सुरु होता. त्यांच्याच नेतृत्वाखाली चिचोंडी पाटील येथे उपबाजारचे काम सुरु झाले असून बाजार समितीच्या कामकाजात सुसत्रता आहे. शिवाजीरावांच्या अकाली निधनाने आता त्यांच्या पश्चात बाजार समितीचा कारभार अक्षय कर्डिले यांच्याच नेतृत्वाखाली चालणार आहे. सर्वांनी अक्षय कर्डिले यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहाणे हीच खरी स्व. कर्डिले यांना श्रद्धांजली ठरेल असे मत माजी सभापती भानुदास कोतकर यांनी मांडले.

मा. खा. दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये स्व. कर्डिले यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ, संतोष म्हस्के, हरिभाऊ कर्डिले, सुधीर भापकर, संजय गिरवले, मधुकर मगर, दत्तात्रय तापकिरे, भाऊ भोर, राजू आंबेकर, सुभाष निमसे, धर्मनाथ आव्हाड, राजेंद्र बोथरा, मंजाबापू घोरपडे, रामदास सोनवणे, निलेश सातपुते, भाऊसाहेब ठोंबे, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, सचिव अभय भिसे, सहसचिव सचिन सातपुते, सहसचिव बाळासाहेब लबडे यांच्यासह संचालक, कर्मचारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संचालकांनी स्व. कर्डिले यांच्या आठवणींना उजाळा दिला.

गेल्या दहा-पंधरा वर्षापासून बाजार समितीचा कारभार आ. कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. बाजार समितीने राज्यात नावलौकिक मिळवला आहे. सर्वसामान्यांच्या सुख दुखात कर्डिले यांनी वाहून घेतले होते. त्यामुळे प्रत्येकाशी त्यांची नाळ जोडली गेली होती. नगर-राहुरी-पाथर्डी मतदारसंघातील आणि नगर तालुक्याच्या विकासामध्ये त्यांचे भरीव योगदान आहे. सर्वांनी स्व. कर्डिले यांना जशी साथ दिली तशीच साथ आता अक्षय कर्डिले यांना द्यावी असे आवाहन माजी सभापती भानुदास कोतकर यांनी केले.

# दिवाळी अंक वाचकांसाठी पर्वणी असते

### किशोर मरकड यांचे प्रतिपादन



दिवाळी अंकाचे किशोर मरकड यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

नगर – जे खास वाचक असतात ते चातकाप्रमाणे दिवाळी अंकांची वाट पाहत असतात. दिवाळी अंक हा वाचकांसाठी पर्वणी असते. असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा अहिल्यानगरचे अध्यक्ष किशोर मरकड यांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून मनोगत व्यक्त करताना केले. ते पुढे म्हणाले की, ज्याप्रमाणे दिवाळीच्या फराळात वेगवेगळे पदार्थ असतात त्याचप्रमाणे दिवाळी अंकात प्रत्येक वाचकाच्या आवडी निवडीप्रमाणे विविध विषयावरील दिवाळी अंकांचा समावेश असतो. प्रत्येक अंकात विविधता असते.

वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी तरुणांमध्ये वाचनाची आवड जोपासण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे. असे किशोर मरकड यांनी सांगितले

पुस्तके मन स्वच्छ करण्याचे साधन आहे. पाचशे रुपयाचे पुस्तक खरेदी करण्यापेक्षा पाचशे रुपयात ग्रंथालयाचे सभासद झाल्यास हजारो पुस्तके वाचनासाठी उपलब्ध होतात. त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. असे प्रतिपादन प्रमुख अतिथी, कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धन पुरस्कार प्राप्त, कवयत्री बेबीताई गायकवाड यांनी केले.

प्रत्येकाने कष्ट घ्यायला पाहिजे. जर आता कष्ट घेतले नाही. तर भविष्यात काही मिळणार नाही. कष्टाला पर्याय नाही. तरुणांमध्ये वाचनासाठी कष्ट घेण्याची प्रवृत्ती कमी होत असल्याची खंत ज्योतिष शास्त्राचे अभ्यासक समर्थ विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना केली.

या प्रदर्शनात विविध विषयावरील दीडशे पेक्षा जास्त दिवाळी अंक उपलब्ध असून हे प्रदर्शन १५ नोव्हेंबर पर्यंत शासकीय सुट्ट्या वगळून सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, ग्रंथालयाच्या सभासदांना हे दिवाळी अंक वर्षभर वाचता येणार आहे. याचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालया मार्फत करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक ग्रंथालय निरीक्षक, रामदास शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन वरिष्ठ लिपिक प्रमोद गिरी यांनी केले.

याप्रसंगी शैलेश घेगडमल, जिल्हा वाचनालयाचे ग्रंथपाल ग्रंथमित्र अमोल इथापे, ग्रंथमित्र संदीप नन्नवरे, संतोष वाडेकर, लक्ष्मण सोनवणे, वसंत कर्डिले, बाबुराव भुजबळ आदींसह वाचक, सभासद उपस्थित होते



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के प्रमाणे लाभांश वाटपास सुरुवात करण्यात आली आहे.

# उत्कृष्ट आर्थिक कारभारामुळे पतसंस्थेचा सभासदांना नेहमीच अभिमान

### उमेश गिल्डा यांचे प्रतिपादन; सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपास सुरुवात

नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी दूरदृष्टीने पतसंस्थेत आदर्श कारभाराची घडी बसवून दिली. त्यानुसार सर्व संचालक मंडळ कामकाज करून अधिकाधिक चांगली आर्थिक सेवा देण्यासाठी योगदान देत आहेत. संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत आहे. आर्थिक स्थिती भक्कम असल्यानेच १५ टक्के लाभांश परंपरा कायम राखली आहे. स्थापनेपासून संस्थेने कायम ऑडिट अ वर्ग मिळवला आहे. संस्था सुवर्ण महोत्सवी वाटचालीच्या दिशेने प्रवास करीत आहे. हे कौतुकास्पद आहे. अशा आदर्श पतसंस्थेचे सभासद असल्याचा नेहमीच अभिमान वाटतो, असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे ज्येष्ठ सभासद व ठेवीदार उमेश गिल्डा यांनी केले.

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के प्रमाणे लाभांश वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. याप्रसंगी गिल्डा बोलत होते. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन समीर बोरा, व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, शैलेश गांधी, ॲड. आनंद फिरोदिया, विनीत बोरा, सौ. सुवर्णा डागा, सौ. प्रिती बोगावत, ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे यांच्यासह पतसंस्थेचे खातेदार व ठेवीदार बाबालाल गांधी, राजेंद्र बलदोटा, संतोष गाढे, सुधीर तावरे, डॉ. मंगेश जहागीरदार, नितीन पटवा, संतोष भळगट, सुधीर भळगट, दिनेश भंडारी, मेहुल भंडारी, किशोर श्रीश्रीमाळ, प्रकाश बोरा व्यवस्थापक प्रशांत भंडारी, कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते

चेअरमन समीर बोरा म्हणाले, सहकार क्षेत्रात सभासद हे त्या संस्थेचे भक्कम आधार असतात. चांगले व्यवस्थापन, विश्वस्त भावनेने कारभार आणि सभासद हित जोपासले तर संस्थेवरील विश्वास दृढ होण्यास मदत होते. जैन ओसवाल पतसंस्था ही सभासदांच्या विश्वासरूपी पायावर भक्कमपणे उभी आहे. सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा यांचा आदर्श समोर ठेवून पतसंस्थेने सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची परंपरा जपली आहे. स्पर्धेच युग आणि आधुनिक काळ लक्षात घेऊन संस्थेने नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून सर्वोत्कृष्ट बँकिंग सेवा देण्याचा संस्था कायम प्रयत्नशील आहे. ज्या सभासदांचे पतसंस्थेमध्ये सेव्हिंग खाते नसल्यास त्वरित उघडून घ्यावे जेणेकरून पतसंस्थेस लाभांश रक्कम सेव्हिंग खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल व सभासदांचे कोणत्याही प्रकारची नुकसान होणार नाही असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन यांनी केले

व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी आभार मानले.

# बाळासाहेब भंडारी कुशल संघटक

### किरण काळे यांचे प्रतिपादन; काँग्रेस कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ठाकरे शिवसेनेच्या वतीने सत्कार



काँग्रेस पक्षाच्या शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी बाळासाहेब भंडारी यांची नियुक्ती झाल्याबद्दल ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांनी सत्कार केला. समवेत अनिस चूडीवाला.

नगर – काँग्रेस पक्षाला भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास आहे. बाळासाहेब भंडारी मागील ३५ ते ४० वर्षांपासून काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून काम करत आहेत. युवक काँग्रेस पासून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. अनेक प्रश्नांवर आजवर त्यांनी आवाज उठविला. पक्ष संघटना बांधणीचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केले. म्हणूनच पक्षाने त्यांच्यावर आता मोठी जबाबदारी सोपविली आहे. भंडारी हे कुशल संघटक आहेत, असे प्रतिपादन ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख किरण काळे यांनी केले आहे.


भंडारी यांची नुकतीच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेस पक्षाच्या शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड केली. त्याबद्दल काळे यांच्या हस्ते ठाकरे शिवसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी काळे बोलत होते. यावेळी अनिस चुडीवाला उपस्थित होते.

काळे म्हणाले, बाळासाहेब भंडारी हे पक्षाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्यरत आहेत. त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. अभ्यासू दृष्टी, संघटनेच्या कामकाजातील बारकाव्यांची उत्तम जाण, निर्भिडता आणि स्पष्ट वक्तेपणा हा त्यांच्यातील उत्तम गुण आहे. जैन ओसवालसह अनेक महत्त्वाच्या संस्थांवर त्यांनी काम केले आहे. राज्यात ठाकरे शिवसेना, काँग्रेससह महाविकास आघाडी आहे. संविधानाचे रक्षण हा आघाडीतील महत्वाचा दुवा आहे. भंडारी यांच्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा महाविकास आघाडीला निश्चितच फायदा होईल.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## उलगडले जांभळ्या वस्त्राचे गूढ



ग्रीसमधील एका प्राचीन मकबऱ्यात जांभळ्या रंगाच्या 'ट्युनिक' या वस्त्राचे अवशेष सापडले होते. हे वस्त्र एकेकाळी अलेक्झांडर द ग्रेट म्हणजेच जगज्जेता सिकंदरला परिधान केलेले वस्त्र असावे, असा दावा काही संशोधकांनी नव्या संशोधनानंतर केला आहे. अर्थातच या दाव्याशी अनेक लोक सहमत नाहीत. हा मकबरा अलेक्झांडरचा पिता 'फिलिप-२' याचा असावा, असे दीर्घकाळ मानले जात होते. मात्र आता हे थडगे अलेक्झांडरचा सावत्र भाऊ 'फिलीप-३'चे असावे, असे म्हटले जात आहे.

अलेक्झांडरच्याच शाही कुटुंबातील व्यक्तींच्या दोन थडग्यांसमोरच हे थडगे आहे. नव्या संशोधनानुसार, हा मकबरा किंवा थडगे अलेक्झांडरच्या वडिलांचे नसून ते अलेक्झांडरचा सावत्र भाऊ फिलिप-३ किंवा अऱ्हीडस याचे असावे. या थडग्यात एक सुती वस्त्र आढळले आहे. हे वस्त्र अलेक्झांडरच्या निधनानंतर त्याला घातलेलेच वस्त्र असावे, असाही संशोधकांचा दावा आहे. त्यानंतर हे वस्त्र अऱ्हीडसकडे आले व त्यालाही याच वस्त्रानिशी दफन करण्यात आले. डेमोक्रिटस युनिव्हर्सिटी ऑफ थ्रेस येथील फिजिकल अँथ्रोपोलॉजी अँड पॅलिओॲंथ्रोपोलॉजीचे प्राध्यापक अँटोनिस बार्टसिओकास यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांनी सांगितले की, हे ट्युनिक पवित्र मानले जात होते व केवळ अलेक्झांडरलाच ते घालण्याची परवानगी देण्यात आली होती. हे ट्युनिक तीन स्तरांचे असून ते जांभळ्या रंगाचे आहे. दोन सुती स्तरांमध्ये हुंटाईट नावाच्या खनिजाचा लवचिक स्तर आहे. प्राचीन काळी जांभळा हा शाही रंग मानला जात असे. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'जर्नल ऑफ फिल्ड आर्किओलॉजी' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. अर्थात या दाव्याला अनेक संशोधकांनी असहमती दर्शवलेली आहे. सध्याच्या ग्रीसमध्ये एकेकाळी मेसेडोनिया राज्य होते व त्याची राजधानी असलेल्या व्हर्जिना शहराजवळ हे थडगे आहे. त्यामध्ये सोन्याच्या पेटीत हे वस्त्र होते. अलेक्झांडरच्या काळात काही समकालीन लोक त्याला देवाचा अवतार समजत असत. काही संशोधकांच्या मते हे अलेक्झांडरचे वस्त्र तर नाहीच; शिवाय ते ट्युनिकही नाही. या थडग्यात दोन व्यक्तींचे सांगाडे आहेत. त्यापैकी एक अऱ्हीडासचा असून दुसरा त्याची पत्नी युरीडीसचा असल्याचे बार्टसिओकास यांचे म्हणणे आहे. अलेक्झांडरच्या इसवी सनपूर्व ३२३ मधील मृत्यूनंतर अऱ्हीडास त्याच्या साम्राज्याचा सम्राट बनला होता. त्याला काही मानसिक विकार होते असे ऐतिहासिक नोंदीवरून संकेत मिळतात व तो राज्य सांभाळण्यास सक्षम नव्हता. त्यामुळे अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्या अनेक सरदारांनी बंड करून स्वतःचे राज्य बनवले व साम्राज्याचे विघटन झाले.

## काही माणसं झोपेत का बडबडतात?

मेंदू हा आपल्या शरीरातील सगळ्यात महत्त्वाचा भाग आहे. मेंदू आपल्या शरीराला कार्य करण्यास मदत करतो. उदाहरण संवाद साधणं, कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देणं तसेच उठण्या-बसण्यापर्यंतही सगळ्या गोष्टींसाठी मेंदू संकेत देतो की, आपण आता हे करायला हवं. कोणतीही क्रिया करताना अनेकदा आपण विचार करतो तर अनेकदा काही गोष्टी पुढच्या सेकंदाला घडतात तर हे कशामुळे तर हे मेंदू जे आपल्याला संकेत देतात त्यावरून होतं. आता तुम्ही झोपेत असतानाच बघा, आपण झोपलेलो असतो तेव्हा आपला मेंदूही झोपतो असं अनेकांना वाटतं. मात्र, हे सत्य नाही. मेंदूचा काही भाग हा सतत काहीतरी क्रिया करत असतो. रात्री आपल्याला अनेकदा स्वप्नं पडतात. काही लोक डोळे उघडे ठेवून झोपतात, काही लोक झोपेत बोलतात आणि काही लोक तर चक्क झोपेत प्रश्नांची उत्तरे देतात. आता हे नक्की कशामुळे होत असेल, हे आज आपण जाणून घेऊया...



२०१७ च्या एका अभ्यासात असं दिसून आलं आहे की, ६६ टक्के लोक हे झोपेत बोलतात आणि लहान मुलांमध्ये ही टक्केवारी ५० टक्के आहे. लहान मुलांमध्ये ही समस्या खूप सामान्य आहे. तुम्हाला असलेला हा त्रास आधी तुमच्या घरच्यांनाच समजून येतो. उदाहरणार्थ, झोपेत हसणं, तोंडातल्या तोंडात पुटपुटणं, ओरडणं, झोपेत लोकांची अभिव्यक्ती बदलणे ही झोपेत बोलण्याची लक्षणं आहेत. यात सामान्य दोन शब्द वापरले जातात ते म्हणजे 'हो' किंवा 'नाही'. झोपेत बोलणं हे अतिविचार, ताणतणाव किंवा आणखी काही मानसिक त्रासामुळे होऊ शकतं. हे धोकादायकसुद्धा असू शकतं. कारण अनेक लोक झोपेत तुमच्या शेजारच्या व्यक्तीला लाथ मारणे, ठोसा मारणे किंवा काहीही करू शकतात. किती तरी लोक झोपेत चालूही लागतात. झोपेत बोलण्याच्या सवयीमुळे किती तरी लोकांना लाज वाटू लागते. कारण चुकून कधी कोणत्या व्यक्तीबद्दल वाईट बोलले आणि त्या व्यक्तीनं ऐकलं तर ते किती लाजिरवाणं होईल, असं त्यांना सतत वाटत असतं. हा त्रास अनुवांशिकसुद्धा असू शकतो. झोपेत बोलण्याची ही घटना मानसिक आजाराशी संबंध असल्याचे अनेक लोक म्हणतात. पण ते तसं नाही.



## चक्क कोंबड्याच्या रूपाची भव्य इमारत

जगभरात वेगवेगळ्या रंग-रूपाच्या अनोख्या इमारती पाहायला मिळतात. कुठे बुटाच्या रूपाची इमारत आहे तर कुठे बास्केटच्या. कुठे पियानोच्या रूपातील इमारत आहे तर कुठे चक्क उडत्या तबकडीच्या. फिलिपाईन्समध्ये आता अशीच एक अनोखी इमारत उभी राहिलेली आहे. एका हॉटेलची ही इमारत चक्क कोंबड्याच्या रूपातील आहे!

आपल्यापैकी अनेकांना चिकन खायला आवडत असेल. पण विचार करा, याच चिकनमध्ये एक फाईव्ह स्टार हॉटेल आहे असं कुणी म्हटलं तर तुम्ही काय कराल? अर्थातच तुम्ही त्याला वेड्यात काढाल. पण होय, हे खरं आहे. एका कोंबड्याच्या शरीरात भलं मोठं हॉटेल तयार करण्यात आलंय. अजूनही विश्वास बसत नाहीये? तर मग हे व्हायरल होणारे फोटो एकदा पाहाच. हे फोटो पाहून खरंच तुम्हीदेखील दंगच व्हाल. तुमचाही आपल्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. अर्थात हा कोंबडा काही खराखुरा नाहीये, तर कोंबड्याच्या आकाराची एक इमारत आहे. हे अनोखं हॉटेल फिलिपाईन्स या देशातील नीग्रो ऑक्सिडेंटल या ठिकाणी आहे. हॉटेलचे मालक रिकार्डो कॅनो ग्वापो टॅन यांच्या पत्नीच्या डोक्यात या हॉटेलची कल्पना सर्वात आधी आली होती. खरं तर ते एका रिसॉर्टची निर्मिती करत होते. पण आपलं रिसॉर्ट आणखी आकर्षक करण्यासाठी त्यांनी एका मोठ्या कोंबड्याच्या आकाराचे हॉटेल तयार केले. या हॉटेलमध्ये १५ आलिशान खोल्या आहेत. त्यामध्ये तुम्हाला सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मिळतात. हे हॉटेल ११५ फूट उंच आणि रुंदीला जवळपास ४० फूट आहे. पण इतका मोठा कोंबडा तयार करणे काही सोपे काम नव्हते. त्यासाठी कर्मचारी वर्ग एक वर्ष अहोरात्र मेहनत करत होता. हा कोंबडा तयार करताना सर्वात मोठे आव्हान होते ते वातावरणाचे. कारण या हॉटेलच्या परिसरात अनेकदा वादळी वारे वाहतात. त्यामुळे कोंबड्याच्या आकाराचे स्ट्रक्चर उभे करणे काही सोपे काम नव्हते. पण काही अमेरिकन इंजिनिअर्स आणि आर्किटेक्टच्या मदतीनं अखेर ८ सप्टेंबर २०२४ रोजी ही इमारत पूर्णपणे उभी राहिली. सध्या हे कोंबड्याच्या आकाराचं हॉटेल इंटरनेटवर जोरदार व्हायरल होत असून त्याने गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये देखील आपलं नाव कोरलं आहे.

## व्यायामामुळे होतो नैराश्याचा धोका कमी

बॅ व्यायामामुळे नैराश्याचा धोका कमी होत असल्याचा दावा एका अभ्यासात करण्यात आला आहे. ब्रिटनमधील लंडन येथील किंग्ज महाविद्यालय येथील संशोधकांनी विविध ४९ अभ्यासातून मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण केले.



व्यायाम केल्यामुळे नैराश्याचा धोका कमी होतो का यासाठी अभ्यासात मानसिकरीत्या निरोगी व्यक्तींचा समावेश करण्यात आला. अभ्यासात २,६६,९३९ व्यक्तींचा समावेश होता. यात ४७ टक्के पुरुषांचा समावेश असून त्यांचा सरासरी ७.४ वर्षे अभ्यास करण्यात आला. माहितीचे विश्लेषण केल्यानंतर व्यायाम न करणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत नियमित व्यायाम करणाऱ्या लोकांमध्ये भविष्यात नैराश्य विकसित होण्याची शक्यता कमी असते. विविध भौगोलिक क्षेत्रातील (उदा. युरोप, उत्तर अमेरिका) युवा आणि वृद्धांमध्ये नैराश्य आल्यास व्यायामाचा त्यावर संरक्षणात्मक परिणाम होतो. नियमित व्यायाम केल्यामुळे लोकांमध्ये नैराश्य विकसित होण्याचा धोका कमी होतो हे जाणून घेण्यासाठी प्रथमच अशा प्रकारचे मेटा-विश्लेषण करण्यात आले आहे, असे ब्राझीलमधील ला सॅले विद्यापीठातील फेलिप बॅरेटो शूच यांनी सांगितले. जे लोक नियमित व्यायाम करतात किंवा शारीरिकदृष्ट्या जास्त सक्रिय असतात, त्यांच्यामध्ये नैराश्य विकसित होण्याचा धोका कमी असल्याचे स्पष्ट पुरावे मिळाले असल्याचे शूच यांनी सांगितले. हा अभ्यास अमेरिकन जर्नल ऑफ सायकियाट्री या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आला आहे.



## आता एआय फ्रॅक्चरही शोधणार

सध्याचा जमाना 'एआय' म्हणजेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा आहे. 'एआय'चा प्रत्येक क्षेत्रात खुबीने वापर केला जाऊ लागला आहे. रुग्णाचा एक्स रे तपासताना फ्रॅक्चर झालेलं हाड शोधण्यातही आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सची डॉक्टरांना मदत होऊ शकते, असा दावा इंग्लंडमधील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ ॲन्ड केअर एक्सलन्स या संस्थेनं केला आहे.

या संस्थेनं पार पाडलेल्या संशोधनातून 'एक्स-रे'चं विश्लेषण करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचं तंत्रज्ञान अतिशय प्रभावी आणि अचूक असल्याचं समोर आलं आहे. यामुळे हाडासंबंधी रोगांचं निदान करणं आता डॉक्टरांसाठी सोपं होणार आहे. कमी वेळेत अचूक निदान होत नसल्यामुळे वारंवार तपासणीसाठी रुग्णालयात जाण्याची वेळ येणाऱ्या रुग्णांनाही यामुळे दिलासा मिळू शकेल. आर्टिफिशियल इंटेलिजन्सची चार तंत्र या खास कामासाठी विकसित केली गेली असून, ब्रिटनमधील सार्वजनिक आरोग्य विभागात लवकरच त्यांचा वापर सुरू केला जाईल, असं म्हटलं जात आहे. हे संशोधन अजून चालूच असून, डेटा गोळा केला जात आहे. पण, आतापर्यंत समोर आलेल्या निष्कर्षातून हाडांमधील दुखापत शोधण्यात हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल, याबाबत शास्त्रज्ञांमध्ये एकमत झाले आहे. अर्थात, निदान करण्याचं काम पूर्णपणे एआयच्या हातात सोपवणं हा हलगर्जीपणा ठरेल. डॉक्टरांनी 'एक्स रे'ची केलेली पाहणी आणि एआयनं केलेलं विश्लेषण अशा दोन्ही मार्गांचा सोबत अवलंब करण्याचा सल्ला या संस्थेनं दिला आहे. एक्स रे पाहून नेमकी कुठल्या हाडाला किती दुखापत झाली आहे, याचा बरोबर अंदाज लावणं हे तसं जिकिरीचं काम आहे. डॉक्टर आणि आरोग्यतज्ज्ञ रोज मोठ्या संख्येनं एक्स रे तपासण्याचं काम करतात. वाढलेली रुग्णसंख्या आणि त्या तुलनेत डॉक्टरांची असलेली कमतरता यामुळे कमी वेळेत घाईने अनेक एक्स रे तपासण्याचा ताण डॉक्टरांवर असतो. एआयच्या आगमनामुळे आता या समस्येवर तोडगा निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ''हे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचं तंत्रज्ञान अतिशय सुरक्षित आणि प्रभावी असून, डॉक्टरांवरील कामाचा ताण यामुळे निश्चितच कमी होईल. कधी कधी हाडांमधील फ्रॅक्चर इतके लहान असतात की घाईत मानवी डोळ्यांनी पाहिल्यावर ते नजरेतून सुटू शकतात. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर आधीच कामाचा भरपूर ताण असतो. या नवीन तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे हा ताण आता हलका होईल,'' अशी आशा नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ ॲन्ड केअर एक्सलन्सचे प्रमुख मार्क चॅपमन यांनी व्यक्त केली.


## प्लास्टिक खाणाऱ्या किड्यांचा शोध



सध्या अवघ्या जगालाच प्लास्टिक कचऱ्याच्या प्रदूषणाची समस्या भेडसावत आहे. प्लास्टिकचे पाण्यात किंवा मातीत सहजपणे विघटन होत नाही. त्यासाठी शेकडो वर्षे लागतात. त्यामुळे हा कचरा तसाच पडून राहतो व तो पर्यावरणासाठी आणि सजीवांच्या आरोग्यासाठीही हानिकारक ठरतो. त्यामुळे प्लास्टिकची विल्हेवाट कशा प्रकारे लावावी, याबाबत सातत्याने नवे संशोधन होत असते. आता आफ्रिकेत असे किडे आढळले आहेत जे प्लास्टिकही फस्त करतात. हा किडा म्हणजे लेसर मीलवर्म. खरे तर हा किडा मूळचा आफ्रिकेचा असला तरी आता जगभर आढळतो. 'अल्फीटोबियस' कुळातील या किड्याचे लाव्हा प्लास्टिक खाऊन ते पचवूही शकतात, असे संशोधकांना आढळले.

विशेषतः, आफ्रिकेतील प्लास्टिक प्रदूषणाचा सामना करण्यासाठी हे नवे संशोधन उपयुक्त ठरू शकते. आफ्रिका हा प्लास्टिक प्रदूषणाच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा खंड आहे. याबाबतच्या नव्या संशोधनाची माहिती 'सायंटिफिक रिपोर्ट्स' या नियतकालिकाच्या नव्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. लेसर मीलवर्म हे पॉलिस्टिरीन पचवू शकतात, असे संशोधनात आढळले. हा प्लास्टिकचा प्रकार स्टायरोफोम फूड कंटेनर्स आणि पॅकेजिंगमध्ये वापरला जातो. या किड्यांची ही वेगळीच उपप्रजाती असावी, असाही कयास आहे. जगभरातील मीलवर्मच्या अन्यही प्रजातींमध्ये हे खरे ठरत असल्याचेही दिसून आले. मात्र, आफ्रिकेचे मूळचे असलेल्या लेसर मीलवर्ममध्ये प्रथमच अशी क्षमता असल्याचे यावेळी आढळल्याचे केनियातील इंटरनॅशनल सेंटर ऑफ इंसेक्ट फिजिओलॉजी अँड इकॉलॉजीमधील फाथिया खमीस यांनी सांगितले. या किड्याच्या लाव्हांना दिलेल्या पॉलिस्टिरीनपैकी ५० टक्के ते फस्त करतात आणि पचवतातही असे आढळले. धान्याच्या कोंड्याबरोबर हे प्लास्टिक खाण्यास दिले तर ते यापेक्षाही अधिक प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटातील जीवाणू प्लास्टिकमधील जटिल पॉलिमर्स तोडण्यास मदत करतात. क्लुवेरा, लॅक्टोकोकस व क्लेबसिल्ला यासारख्या कुळातील जीवाणू पॉलिस्टिरीनचे पचन करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. ते प्लास्टिकचे अशा सुलभ संयुगात रूपांतर करतात, जे मीलवर्मसाठी हानिकारक ठरत नाही.

## जर्मनीत आढळला हिंदी पंचांगाचा कागद!



कुठली वस्तू कुठे पोहोचेल, हे काही सध्याच्या जमान्यात सांगता येत नाही. एका जर्मन व्यक्तीने अलीकडेच रेडिटवर देवनागरी लिपीतील मजकूर असलेल्या कागदांचे काही फोटो शेअर केले आहेत. हे कागद त्याला हॅम्बर्गमधील एका फ्ली मार्केटमध्ये सापडले. या छायाचित्रांमध्ये हिंदी मजकूर असलेली दोन पिवळसर पाने दिसत आहेत. या वापरकर्त्याने मजकुराचा उगम आणि अर्थ समजून घेण्यासाठी रेडिट समुदायाकडे मदतीची विनंती केली. त्यामुळे अनेक भारतीयांनी यावर प्रतिक्रिया देत, आश्चर्य व्यक्त केले आहे.

या जर्मन व्यक्तीने फ्ली मार्केटमध्ये सापडलेल्या देवनागरी लिपीतील पिवळसर झालेल्या दोन पानांचे फोटो रेडिटवर शेअर केलेल्यावर नेटकऱ्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली. त्यांनी सबरेडिटमध्ये ही पोस्ट शेअर करत भारतीय वापरकर्त्यांना या मजकुराची ओळख पटवण्यास मदत करण्याची विनंती केली. प्रथमदर्शनी त्यांनी हा मजकूर हिंदी किंवा संस्कृत असावा, असे ओळखले होते. भारतीय रेडिट वापरकर्त्यांनी तत्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला. त्यांनी हा मजकूर पंचांगातील असल्याचे ओळखले. वापरकर्त्यांनी नमूद केले की हे विशेष पंचांग वाराणसीमध्ये भास्कर प्रेसद्वारे छापले गेले असावे, ज्याचे मालक पंडित नवल किशोर भार्गव होते. नवल किशोर भार्गव हे त्या काळातील एक प्रसिद्ध प्रकाशक होते. एका वापरकर्त्याने आपल्या कुटुंबाची माहिती शेअर केली आणि सांगितले, ''या प्रेसचे संचालन माझे पूर्वज पंडित नवल किशोर भार्गव यांनी केले होते. ज्यांचा प्रकाशन क्षेत्रात मोठा प्रभाव होता. या नव्या माहितीमुळे प्रभावित झालेल्या जर्मन व्यक्तीने सर्वांचे आभार मानले आणि विचारले की हा दस्तऐवज दुर्मीळ आहे का?.. काही लोकांनी उत्तर दिले की, याला आर्थिक दृष्टिकोनातून मोठे मूल्य नसले तरी त्याला सांस्कृतिक महत्त्व आहे. विशेषतः, हा दस्तऐवज त्याच्या मूळ स्थानापासून इतक्या दूर कसा पोहोचला यामुळे याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळेच जर्मन व्यक्तीने या पंचांगाचे योग्यरीत्या जतन करण्याचे ठरवले आहे. या दस्तऐवजाच्या घडलेल्या प्रवासाचा आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे तो हे करत आहे, असेही त्याने म्हटले आहे.

## 'लिग्नोसॅट'ची अंतराळभरारी



जगातील पहिले लाकडी सॅटेलाईट गेल्या मंगळवारी म्हणजे ५ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहे. स्पेसएक्सच्या ड्रॅगन कार्गो कॅप्सूलमधून जपानचे हे लाकडी सॅटेलाईट तिथे पाठवण्यात आले. या सॅटेलाईटचे नाव 'लिग्नोसॅट' असे आहे. त्याची प्रत्येक बाजू ४ इंच म्हणजेच दहा सेंटिमीटरची आहे.

नासाच्या इंटरनॅशनल स्पेस स्टेशन प्रोग्रॅमच्या डेप्युटी चीफ सायंटिस्ट मेघन इव्हेरेट यांनी सांगितले की, असे लाकडी सॅटेलाईट हे अधिक किफायतशीर व पर्यावरणपूरक ठरू शकतात. त्यांच्यामुळे पारंपरिक सॅटेलाईटच्या तुलनेत प्रदूषण होण्याची शक्यता नाही. नेहमीचे सॅटेलाईटस्? हे अ‍ॅल्युमिनियमपासून बनवलेले असतात. ज्यावेळी त्यांचे आयुष्य संपते व ते पाडले जातात त्यावेळी ते पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच जळतात आणि त्यांच्यापासून अ‍ॅल्युमिनिअम ऑक्साईड बनते. त्याच्यापासून पृथ्वीच्या औष्णिक संतुलन व संरक्षक अशा ओझोन स्तराला धोका संभवतो. आता पृथ्वीच्या भोवती अशा सॅटेलाईटस्ची संख्या प्रचंड वाढलेली असल्याने त्यांच्या प्रदूषणाचा धोकाही वाढला आहे. 'स्पेस एक्स'च्या स्टारलिंक कार्यक्रमात तर असे हजारो सॅटेलाईटस्? सोडले जात आहेत. सध्या या मोहिमेत सुमारे ६५०० सॅटेलाईटस्? कार्यरत आहेत. विविध देशांनी आजपर्यंत सोडलेले सॅटेलाईटस्? तर वेगळेच! जपानने बनवलेल्या लिग्नोसॅट सॅटेलाईटमुळे अशा प्रदूषणाचा धोका नाही. हे सॅटेलाईट बनवण्यासाठी अ‍ॅल्युमिनिअमऐवजी मॅग्नोलिया लाकडाचा वापर केला आहे. जपानच्या क्योटो युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक व निवृत्त अंतराळवीर ताकाओ दोई यांनी म्हटले आहे की भविष्यात धातूपासून बनवलेले सॅटेलाईटस्? सोडण्यास बंदी घातली पाहिजे. जर हे पहिले लाकडी सॅटेलाईट नेहमीच्या सॅटेलाईटप्रमाणेच उत्तमरीत्या काम करते हे सिद्ध झाले तर एलन मस्क यांच्या स्पेस एक्सनेही त्याचा कित्ता गिरवावा.

